रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३१३ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २० एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

## दिनेश त्रिपाठी नौदलाचे प्रमुख

**नवी दिल्ली :** भारत सरकारने नौदलाचे प्रमुख म्हणून दिनेश त्रिपाठी यांची नियुक्ती केली. ते सध्या नोदलाचे उपप्रमुख आहेत. दिनेश त्रिपाठी नौदलाचे प्रमुख म्हणून महिनाअखेरीस ३० एप्रिलला पदभार स्वीकारणार आहेत. केंद्र सरकारने गुरुवारी (१८ एप्रिल) रात्री उशिरा त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. दिनेश त्रिपाठी मागच्या ४० वर्षांपासून नौदलात कार्यरत आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या कामगिरी आणि जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. सध्या ते नौदलाचे उपप्रमुख असून, यापूर्वी ते पश्चिम नौदल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ होते.

## धनगर आरक्षणाची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** अनुसूचित जमातीमधून आरक्षण मिळावे यासाठी धनगर समाजाने दाखल केलेल्या याचिकेला नंदुरबार जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व आदिवासी हक्क संरक्षण समितीचे सचिव सुहास नाईक यांनी आव्हान दिले होते. यावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. मुंबई उच्च न्यायालयातील निकाल कायम ठेवत सर्वोच्च न्यायालयाने धनगर आरक्षणाची याचिका फेटाळून लावली आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला आव्हान देत नाईक यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.




**आजचा अग्रलेख**
**आघाडीची घोडदौड**

### वेधक

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

**अलिबाग :** तालुक्यातील सोगाव येथील एसओएसमधील एका अल्पवयीन मुलाचे अपहरण करण्यात आले. ही घटना मंगळवारी दुपारी घडली असून, याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पन्हाळामधील १४ वर्षीय मुलगा या बालग्राममध्ये गेल्या अनेक वर्षांपासून आहे. मंगळवारी सकाळी नाश्ता करून बालग्राममधील आवारात खेळत होता. त्यानंतर तो बेपत्ता झाला. दरम्यान, येथील कर्मचाऱ्यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार विनोद गायकवाड करीत आहेत.

## कुमुदिनी चव्हाण निवडणूक लढणार

**दिघी :** रायगड लोकसभेत निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या वंचित बहुजन विकास आघाडीच्या उमेदवार कुमुदिनी चव्हाण यांनी शुक्रवारी (दि. १९) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत त्यांनी हा उमेदवारी अर्ज दाखल केला. पेशाने शिक्षिका असलेल्या कुमुदिनी चव्हाण आता लोकसभेच्या रिंगणात उतरल्या असून, आपली पूर्ण ताकद त्या या निवडणुकीत लावणार आहेत. दरम्यान, रायगडच्या लोकसभा लढतीत खरी लढत ही महाविकास आघाडीचे अनंत गीते आणि महायुतीचे सुनील तटकरे यांच्यात होणार आहे.

## यशवंत पवारांनी भरला अर्ज

**नेरळ :** मावळ लोकसभा मतदारसंघात शुक्रवारी (दि. १९) पहिला उमेदवारी अर्ज दाखल झाला. कर्जत येथील रहिवासी असलेले कार्यकर्ते यशवंत विठ्ठल पवार यांनी क्रांतिकारी जयहिंद सेना या पक्षाच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज पिंपरी चिंचवड प्राधिकरण येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर केला. मावळ लोकसभा मतदारसंघात १३मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी नामांकन अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, या मतदारसंघातील पहिला नामांकन अर्ज आज १९ एप्रिल रोजी यशवंत विठ्ठल पवार यांनी अर्ज दाखल केला.

### देशात पहिल्या टप्प्यातील मतदान उत्साहात; पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक


# मतदारांनी गाठली ‘साठी’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**अठराव्या लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्याच्या मतदानाला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रातील ५ जागांसह देशभरात २१ राज्यांमध्ये १०२ मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडली असून, सरासरी ६० टक्के मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक (७७.५७ टक्के) तर बिहारमध्ये सर्वात कमी (४६.३२ टक्के) मतदान झाले. महाराष्ट्रातील रामटेक, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि भंडारा-गोंदिया या मतदारसंघात (५४.८५ टक्के) मतदान झाले. लोकसभेसह अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीमच्या विधानसभेच्या ९२ जागांसाठीही मतदान पार पडले.**

दरम्यान, पहिल्या टप्प्यात नऊ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री आणि एका माजी राज्यपालांचे भवितव्य पणाला लागले आहे. सकाळी ७ वाजता सुरू झालेले मतदान सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होते. अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. महाराष्ट्रातील पाच मतदारसंघात ५४.८५ टक्के इतके मतदान झाले.


निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या टप्प्यात १६.६३ कोटिहून अधिक मतदान आहेत. यामध्ये ८.४ कोटी पुरुष आणि ८.२३ कोटी महिला मतदार आहेत. त्यापैकी ३५.६७ लाख नवमतदार असून, त्यांनी पहिल्यांदाच मतदान केले आहे. तर, २० ते २९ वयोगटातील मतदारांची सख्या ३.५१ कोटी आहे. पान ५ वर




**मतदार संघ 102 | राज्य 21 | मतदान 59.71%**

### राज्यात ५ मतदारसंघात ९७ उमेदवार

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील नागपूर, चंद्रपूर, रामटेक, गडचिरोली-चिमूर आणि भंडारा-गोंदिया या लोकसभेच्या ५ मतदारसंघांमध्ये मतदान पार पडले. यात नागपूरमध्ये २६, चंद्रपूरमध्ये १५, रामटेकमध्ये २८, भंडारा-गोंदियामध्ये १८, तर गडचिरोलीत १० उमेदवार लोकसभेत आपलं नशीब अजमावत आहेत. पहिल्या टप्प्यात मतदानाला सामोरे जाणारे सर्व मतदारसंघ हे विदर्भातील आहेत.




### फायदा कुणाला?

निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याने त्याचा फायदा कुणाला मिळतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. सर्वसाधारणपणे जेव्हा मतदानाचा टक्का वाढतो, तेव्हा सत्ताधारी पक्षाच्या विरोधात जनतेची नाराजी व्यक्त होते, असे मानले जाते.

### मतदानासाठी जनजागृती

भारतीय लोकशाहीच्या भवितव्यासाठी संविधानाने दिलेला सर्वात महत्त्वाचा हक्क बजावण्याची संधी पुन्हा एकदा मतदारांकडे आहे. त्यामुळे कुठलीही टाळाटाळ न करता मोठ्या संख्येने मतदान करण्यासाठी शासकीय स्तरावर किंवा इतर विविध संस्थांतर्फे जनजागृती करण्यात आली आहे. मतदानाचा टक्का वाढवा यासाठी प्रशासनाने मतदानप्रक्रियेची पूर्ण तयारी केली असून, सुरक्षेच्या अनुषंगाने कडेकोट पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. सोबतच नागपुरात आठ विशेष मतदान केंद्रही उभारण्यात आले होते. एकुणात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सर्व स्तरावरच्या यंत्रणा कामाला लागल्याचे दिसून आले.

## रायगड मतदारसंघात उमेदवारांची मांदियाळी

- तब्बल २८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात
- निवडणूक विभागाला जोडावी लागणार दोन बॅलेट युनिट

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभेसाठी अखेरच्या दिवशी तब्बल १९ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. शुक्रवारी (दि. १९) अखेरपर्यंत एकूण २८ उमेदवारांनी ४० अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी (२२ एप्रिल) यातील काही उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली नाही, तर निवडणूक विभागाला दोन बॅलेट युनिट जोडावी लागणार आहेत. त्यामुळे निवडणूक विभागाची सध्यातरी डोकेदुखी वाढली आहे.




मतदान यंत्रे प्रतियंत्र केवळ १६ उमेदवार निवडी हाताळू शकतात (नोटाचे बटण धरुन). रायगड लोकसभेमध्ये तर, २८ उमेदवार आपले राजकीय नशीब अजमावण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे निवडणूक विभागाची चांगलीच तांत्रिक अडचण होणार असल्याचे दिसते. बॅलेट युनिटवर उमेदवाराचे नाव, पक्षचिन्ह आणि एका बाजूला मतदारांना मतदान करण्यासाठी एक बटण असते. एका युनिटवर १६ उमेदवारांची मर्यादा असते. एका कंट्रोलिंग युनिटला २४ बॅलेट युनिट जोडण्याची सोय करण्यात आली आहे.

उमेदवारांची संख्या जितकी वाढेल, तितकी ती निवडणूक प्रक्रिया राबविणे कठीण जाईल. एकतर निवडणूक आयोगाकडे स्वतःचा कर्मचारी वर्ग नाही. आयोगाला केंद्रीय व राज्य कर्मचाऱ्यांकडून निवडणुकांची कामे करून घ्यावी लागतात. मतदान केंद्रावर एक केंद्राधिकारी, अधिकारी १, अधिकारी २ आणि एक कर्मचारी असे कर्मचारी लागतात. जर उमेदवारांची संख्या अधिक वाढल्यास कर्मचाऱ्यांची संख्याही वाढवावी लागेल. त्याकरिता लागणारे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होणार का, असाही प्रश्न आहे.

निवडणुकीतील उमेदवारांच्या संख्येवर मर्यादा नाहीत. लोकशाही असल्याने संविधानातील सभागृहाच्या पात्रतेनुसार निवडणुकीस उभे राहण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. लोकसभा निवडणुकीची अनामत रक्कम २५ हजार रुपये आहे. तर अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांना १२ हजार ५०० रुपये आहे. ही अनामत रक्कम वर्गणीद्वारे गोळा करणे एका गावाला कठीण नाही. ही रक्कम आणि संविधानाने निश्चित केलेली लोकसभेची पात्रता पूर्ण करणारा मतदार उमेदवार बनू शकतो. वयाची २५ वर्षे पूर्ण करणारा भारतीय नागरिक उमेदवार म्हणून पात्र असल्याने उमेदवारांची संख्या मोठी राहू शकते. पान ५ वर

## एसटी बसचा अपघात | १५ ते २० प्रवासी जखमी



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

प्रवाशांनी भरलेल्या एसटी बसला अपघात झाल्याची घटना शुक्रवारी (दि.१९) दुपारी साडेबाराच्या सुमारास आसुडगाव एनएमएमटी बस डेपो (खांदा कॉलनी) जवळील रस्त्यावर घडली. या अपघातात जवळपास १५ ते २० प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली आहे.

एमएच १४ बीटी २०९० या क्रमांकाची एसटी बस जव्हार होऊन स्वारगेटला जात होती. यावेळी जवळपास ४० ते ४५ प्रवासी एसटी बसमध्ये बसले होते. दुपारी साडेबाराच्या दरम्यान बस पेट्रोल पंपासमोरील पान ५ वर

## पाकीटमारी थांबवण्याची गरज

### शरद पवारांचा भाजपाला खोचक टोला

**। पुणे । प्रतिनिधी ।**

भाजप सरकारने शेतकऱ्यांचा शेतीमाल दुध, साखर स्वस्त केले. तर दुसऱ्या बाजूला इंधनाच्या किमती वाढविल्या. शेतकरी पिकवितात ते स्वस्त आणि दुसरे पिकवितात, ते महाग करण्याचे केंद्राने धोरण राबविले. शेतकऱ्यांच्या एका खिशात पैसे टाकून दुसऱ्या खिशातून दुप्पट पैसे काढून घेतले जातात. ही एक प्रकारची पाकीटमारी आहे. पाकीटमारी बंद करण्यासाठी निर्णय घेणाऱ्याला बाजूला करण्याची गरज असल्याची टीका शरद पवार यांनी केंद्र सरकारवर केली.



कन्हेरी (ता. बारामती) येथे खासदार सुप्रिया सुळे यांच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या प्रचाराचा शुभारंभ पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पवार बोलत होते. पवार पुढे म्हणाले, अमित शहा नावाचे गृहस्थ गेल्या दहा वर्षात शरद पवार यांनी काय केल याचा हिशोब मागतात. गेल्या दहा वर्षात सत्ता कोणाची आहे, मंत्री कोण आहे. मी सत्तेत नव्हतो, पण हिशोब मात्र मला मागतात, असा टोला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांना लगावला.पवार पुढे म्हणाले, मोदी फडवणीस यांच्यासह अन्य नेते आमच्या विरोधात घटना बदलण्याचा खोटा प्रचार सुरु पान ५ वर

## प्रचाराचा नारळ फुटला; राष्ट्रवादी काँग्रेसची पाठ

- पेण शहरात कार्यकर्त्यांची वानवा

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरात शुक्रवारी (दि. १९) महायुतीच्या प्रचाराचा नारळ पेण येथील कोल्हेटकर मंदिरात फोडण्यात आला. कार्यक्रमाची वेळ चारची ठरली होती. भाजप कार्यकर्ते चार वाजल्यापासून मोठ्या संख्येने हजर होते. परंतु, ज्या पक्षाचा उमेदवार आहे, त्या पक्षाचे कार्यकर्ते पाच वाजले तरी हजरच नव्हते. अखेर ५.१० च्या सुमारास प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. तरीदेखील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) कार्यकर्ते हजर नव्हते.

पेण शहरात सध्याच्या स्थितीला राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) ६ नगरसेवक, माजी नगराध्यक्ष, माजी पान ५ वर

### तरुणीवर अत्याचाराप्रकरणी पोलिसात गुन्हा

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघर वसाहतीमध्ये राहणाऱ्या एका पंचवीस वर्षांच्या तरुणीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक बाब वाशीमध्ये घडली आहे. याबाबत पीडित तरुणीने खारघर पोलिसांना दिलेल्या तक्रारीमध्ये मागील दोन वर्षांत वाशीमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने हा अत्याचार केल्याचे सांगितल्यावर पोलिसांनी याबाबत बलात्कार आणि फसवणुकीचा गुन्हा या पान ५ वर

## अधिकारी रमले निवडणुकीत

### कर्जत तालुक्यात अनधिकृत कामे जोरात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

देशात लोकसभा निवडणुका सुरू असून, देशातील प्रत्येक तालुक्यातील अधिकारी निवडणुकीचे कामात व्यस्त आहेत. तसेच कर्जत तालुक्यातील अधिकारी निवडणुकीच्या कामात गुंतले असून, त्याचा फायदा तालुक्यातील अनधिकृत कामे करण्यासाठी उचलला जात आहे. दरम्यान, तालुक्यातील बहुतेक सर्व भागात जमिनी सपाटीकरण कामे आणि जंगलतोड आणि नद्या वाळू काढण्यासाठी नद्या पोखरल्या जात असून, ही सर्व कामे जोरात आणि बिनदिक्कतपणे सुरू आहेत. याबद्दल सर्वसामान्य जनता आवाज उठवत असताना, प्रशासन डोळेझाक करीत असल्याने तालुक्यातील आम जनता नाराजी व्यक्त करीत आहेत.

**बेसुमार जंगलतोड, जमीन सपाटीकरणास ऊत**



कर्जत तालुक्यात सध्या निवडणुकीचे वारे जोरात सुरू आहेत. त्यामुळे अधिकारी निवडणुकीच्या कामात दंग असताना पान ५ वर

> आपल्या भागातील झाडांचे घटते प्रमाण लक्षात घेऊन वृक्षारोपण लागवड स्पर्धा व्हायला हवीत. प्रत्येक महिन्याला झाडे लावून त्यांचे फोटो आपल्या मोबाईलचे स्टेटस म्हणून ठेवावेत, अशी आपली इच्छा आहे.
>
> – विकास चित्ते, निवृत्त अधिकारी

### आरटीई अंतर्गत प्रवेशाला जिल्ह्यात थंडा प्रतिसाद

# जागा २१ हजार ६०४, अर्ज दाखल फक्त २०७

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

आरटीई ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत नोंदणी करण्यासाठी रायगड जिल्ह्यातून अल्प प्रतिसाद मिळत आहे. रायगड जिल्ह्यात दोन हजार ९१० शाळा आहेत. त्यामध्ये २१ हजार ६०४ जागा आरटीईनुसार आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. शुक्रवारपर्यंत फक्त २०७ अर्ज दाखल झाले होते. जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यातून प्रवेश अर्ज भरण्यास म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच अर्ज भरले गेले आहेत.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के आरक्षित जागांवर ऑनलाईन प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्यातील ७६ हजार ३६ शाळांमधील आठ लाख ८६ हजार १५९ जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. रायगड जिल्ह्यात दोन हजार ९१० शाळा आहेत. त्यामध्ये २१ हजार ६०४ जागा आरटीईनुसार आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, शुक्रवारपर्यंत फक्त २०७ जणांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यातील बहुतांश शाळा या शासकीय, अनुदानित व स्थानिक स्वराज्य संस्थांच्याच आहेत. त्यामुळे किती पालक प्रवेशास पसंती देतात, याबाबतचे चित्र पुढील काही दिवसात स्पष्ट होणार आहे. मंगळवारपासून (ता.१६) अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, ३० एप्रिल अंतिम मुदत आहे. त्यामुळे विद्यार्थी तसेच पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण, गेल्या काही महिन्यांपासून ही प्रवेश प्रक्रिया रखडली होती. प्रवेश प्रक्रिया कधी सुरू होईल या प्रतिक्षेत विद्यार्थी आणि पालक पान ५ वर



**आरटीई प्रवेश प्रक्रियेत यंदापासून काही बदल**

विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटरपर्यंतच्या अंतरादरम्यान अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांची शाळा नसेल तर एक किलोमीटरच्या अंतरावरील खासगी शाळेत त्यांना प्रवेश दिला जाणार आहे. या शाळांची निवड करताना शासकीय शाळा, अनुदानित शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व शेवटी खासगी शाळा या प्राधान्यक्रमानुसार मुलांना प्रवेश दिला जाणार आहे. यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी लागणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली.

**अशी करा नोंदणी**

आरटीई अंतर्गत पाल्यांना शिक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी पालकांना ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. ऑनलाईन प्रक्रियेद्वारा नोंदणी झाल्यानंतर, आरटीईचा लाभ घेता येईल. नोंदणीसाठीचे नियम, आवश्यक कागदपत्रे आदींबाबत https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे. पालकांनी या संकेतस्थळावर जाऊन अधिक माहिती तपासावी, असे आवाहन केले आहे.

## रोपवेला आणखी एक ट्रॉली

### रायगडावरील प्रवास आणखी सुखकर

**। महाड । प्रतिनिधी ।**

रायगड किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या शिवभक्तांच्या सेवेसाठी रोप-वेच्या सध्या तीन ट्रॉल्या होत्या, त्यामधून एका वेळेला ३२ प्रवासी चढ-उतार करत होते. पण, या रोप-वेला आणखी एक ट्रॉली लावण्यात आल्याने आता एकाच वेळी ४८ प्रवासी चढ-उतार करुन शकणार आहेत. ज्यात २४ वर जाणाऱ्या आणि २४ खाली येणाऱ्या प्रवाशांचा समावेश आहे. या ट्रॉलीची चाचणी पूर्ण झाल्यानीक्ष २४ एप्रिलपासून पर्यटकांसाठी खुली होणार आहे.



महाराष्ट्रसह जगभरातून किल्ले रायगड पाहायला येणाऱ्या शिवभक्त शिवप्रेमी पर्यटक यांच्या सेवेसाठी रायगड रोपवे प्रशासन सज्ज झाले असून, रायगड रोपवेची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरू आहे. रोपवेमध्ये आणखी नवीन ट्रॉलीची भर पडली असून, किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवप्रेमी पर्यटकांना रोपवेतून गडावर जाण्यासाठी जी वाट पाहावी लागत होती, ती आता काहीशा प्रमाणात निश्चितच कमी होणार आहे. पर्यटकाकडून रायगड रोपवे प्रशासनाला धन्यवाद देण्यात येत असल्याचे ऐकायला मिळत आहेत. त्याआधी तीन ट्रॉल्या गडावर जात होत्या, त्याचवेळी तीन ट्रॉल्या खाली येत होत्या; पान ५ वर




## वेधक

### रामटेकमध्ये २८ उमेदवार रिंगणात

**नागपूर :** महाविकास आघाडीचे श्याम बर्वे यांच्या माध्यमातून सुनील केदार यांनी मोठे आव्हान उभे केले आहे. वंचितचा कुकर किती प्रेशर आणतो आणि बसपाचा हत्ती किती धावतो यावर महायुतीचे राजू पारवे यांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. रामटेकमधील काँग्रेसचे उमेदवार बर्वे यांची निवडणूक माजी मंत्री सुनील केदार यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. त्यामुळे अनेक जण धास्तावले आहेत. मुख्यमंत्र्यांनी उमरडेमधून काँग्रेसचे आमदार पारवे यांच्या हाती धनुष्यबाण दिला आहे. येथून सर्वाधिक २८ उमेदवार रिंगणात आहेत.

### पर्यावरण रक्षणासाठी निवडणूक लढणार

**कोल्हापूर :** कोल्हापूर लोकसभा मतदारसंघासाठी १९ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात झुंबड उडाली आहे. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि.१८) कोल्हापूर लोकसभेसाठी अपक्ष उमेदवार संदीप संकपाळ यांनी तिसऱ्यांदा उमेदवारी अर्ज दाखल केला. यंदा त्यांनी पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी चक्क सायकलवरून जिल्हाधिकारी कार्यालयात येत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कोल्हापुरातील प्रदूषणाच्या समस्येकडं सर्वांचं लक्ष जावं, या अनुषंगाने अपक्ष उमेदवारांनी सायकलवरून प्रवास करत उमेदवारी अर्ज दाखल केला.

### रेड्यावर बसून भरला अर्ज

**सोलापूर :** सोलापुरात मराठा बांधवांकडून अनोखं शक्ती प्रदर्शन पाहायला मिळालं. मराठा समन्वयक रामभाऊ गायकवाड यांनी रेड्यावर बसून यमाचा वेशभूषा करून आपला उमेदवारी अर्ज भरला. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. माढा मतदारसंघातही मराठा समाजातर्फे उमेदवारी अर्ज भरण्यात आला आहे. मराठा समन्वयक गायकवाड यांनी आपला अर्ज भरला. यावेळी त्यांचं वाहन आणि वेशभुषा आकर्षणाचा विषय ठरली. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे. केंद्रात बोकाळलेला भ्रष्टाचार याच्या विरोधात माढा लोकसभा मतदासंघातून अर्ज भरला असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

# अजित पवारांमुळे शिंदे गटाला फटका

## तीन ते चार जागांवर नुकसान, कार्यकर्त्यांमध्ये नाराजी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आतापर्यंत लोकसभेच्या दहा जागी आपले उमेदवार घोषित केले आहेत. मात्र अजूनही ते तीन ते चार जागांसाठी महायुतीत संघर्ष करत असल्याचे चित्र आहे.आधी २० ते २२ जागा लढवण्याची शक्यता असलेल्या शिंदे गटाला प्रत्यक्षात तेरा ते चौदा जागाच लढवाव्या लागत आहेत. त्याही मिळवताना त्यांना प्रचंड दमछाक होत आहे. विशेषतः अजित पवारांचा महायुतीत समावेश झाल्यानंतर शिंदे गटाला हक्काच्या जागांवर पाणी सोडावे लागल्याने ही घालमेल वाढली आहे.



अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमुळे शिंदे गटाला उस्मानाबाद, परभणी व शिरूरची हक्काच्या जागा सोडाव्या लागल्या आहेत. नाशिकवरून झालेल्या संघर्षातही ही जागा अजित पवार गटाला जवळजवळ निश्चित झाल्याचे समजते आहे. त्यामुळे या हक्काच्या चार जागा पवार गटाला सोडाव्या लागल्याने व त्यातच ठाणे, पालघर, उत्तर पश्चिम मुंबई, उत्तर मध्य मुंबई, औरंगाबाद, याही जागेवरून भाजपशी टक्कर द्यावी लागत असल्याने शिंदे गटाची मोठी अडचण झाली आहे.

लोकसभेच्या प्रचाराचा पहिला टप्पा संपत आला असला तरी अजुनही महायुतीच्या आठ जागांवर वाद सुरु आहे. यामध्ये प्रामुख्याने ठाणे, पालघर, नाशिक, औरंगाबाद, उत्तर पश्चिम मुंबई व दक्षिण मुंबई या जागेवरून अजूनही कोणता पक्ष जागा लढवणार यावरून निश्चिती होताना दिसत नाही. महायुतीतील तीन पक्षांत विशेषतः शिंदे गटाने एकूण किती जागा लढवायच्या यावरुन मोठी अडचण निर्माण झाली आहे. विशेषतः अजित पवार गटामुळे मोठा तोटा झाल्याची भावना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये व नेत्यांमध्ये निर्माण झाली आहे. आम्हाला हक्काच्या जागाही मिळत नसल्याने आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना काय उत्तर देणार, असाही सवाल शिंदे गटाच्या नेत्यांना पडत असल्याची महिती आहे. त्याचबरोबर विरोधकांच्या कडव्या टीकेलाही तोंड देताना आमच्या नाकी नऊ येत असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

**शिंदे गटाला सोडाव्या लागलेल्या जागा**

**१) धाराशिव २) शिरूर ३) परभणी मुंबई-पुणे राज्यमार्गाला जोडला गेल्यामुळे येथे दळणवळण सोपे होईल. याचबरोबर भविष्यात आपत्कालीन रस्ता म्हणून उपयोगी ठरेल.**

# नाशिकमधून छगन भुजबळ यांची माघार

**। नाशिक । प्रतिनिधी ।**



नाशिक लोकसभा मतदारसंघातून महायुतीकडून छगन भुजबळ हे निवडणूक लढवतील, अशी चर्चा होती. मात्र, भुजबळांनी या निवडणुकीतून माघार घेतली आहे. स्वतः त्यांनीच पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली. भुजबळ म्हणाले की, मी नाशिकमधून लढावी, असे मोदी-शाहांनी सुचवले होते. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मात्र, मी नाशिकमधून लढणार नाही, मी माघार घेतली आहे. नाशिकमध्ये मराठा समाजाचे लोक माझ्यासोबत होतो. पाच वर्षांमध्ये जी कामं झाली आहेत त्यामुळे त्यांनी मला समर्थन दिलं होतं. परंतु मी माघार घेत आहे, असं भुजबळ म्हणाले.

तीन आठवडे गेले तरी उमेदवार जाहीर झाले नाहीत. विरोधी पक्षांचे उमेदवार जाहीर होऊन त्यांचा प्रचारदेखील पुढे गेला आहे. यापेक्षा जास्त उशीर झाला तर नाशिकमध्ये महायुतीला अडचण येऊ शकते. सध्या जी संदिग्धता आहे, त्यामुळे मी हा गोंधळ दूर करण्यासाठी भूमिका जाहीर करत आहे. परंतु, नाशिकच्या जागेबाबत अधिकृत घोषणा होत नसल्याने, तिढा सुटत नसल्याने मी माघार घेतली आहे असे स्पष्ट केले.

# सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराला शुभारंभ

**। काटेवाडी । प्रतिनिधी ।**

देशाचे गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्रातील अनेक सभांमध्ये दहा वर्षात शरद पवारांनी काय केले असा सवाल उपस्थित करतात. खरे पाहता दहा वर्षांपासून भाजपची सत्ता आहे. सत्तेमध्ये ते स्वतः असताना मला विचारतात की मी दहा वर्षात काय केले. सत्ता त्यांच्याकडे आणि हिशोब मला मागतात अशी गंमत आहे, अशा शब्दात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शहा यांच्या विधानाची खिल्ली उडवली.

आज पेट्रोल, डिझेल, गॅस आदींचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मात्र जे तुम्ही पिकवता त्या पिकाला दर नाही. साखर, दूध वेगवेगळी पिके यांच्या दरांची सद्यस्थिती काय आहे. ज्यातून तुमच्या खिशात पैसे येतील ते स्वस्त करायचे आणि ज्या माध्यमातून त्यांचे खिशे भरले जातील ते महाग करायचे. वरच्या खिशात तुम्हाला अनुदान द्यायचे आणि खालच्या खिशातून काढून घ्यायचे. अशा पद्धतीचे काम सध्या सुरू आहे, अशा शब्दात माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी भाजप सरकारवर हल्ला चढवला.

यावेळी, खा. सुप्रिया सुळे, आ. संजय जगताप, आ. रोहित पवार, विकास लवांडे, युगेंद्र पवार यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाला बारामती सह राज्यभरातील अनेक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

### महायुतीच्या उमेदवारांची नावे गुलदस्तात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सात मतदारसंघात उमेदवार कोण हे महायुतीने घोषित केलेले नाही. २०१९ साली भाजपने २५ लोकसभा जागा लढवल्या होत्या. महायुतीत दोन नव्या पक्षांना सामावून घेतले असले तरी भाजपची राजकीय जागा राज्यात कमी झालेली नाही. युती करताना भाजपचे नुकसान होवू देणार नाही, असे उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत असत. गेल्या वेळी शिवसेनेने २३ जागा लढवल्या होत्या. त्यातील १३ खासदार शिंदेंसमवेत आले. तरी अद्याप शिवसेनेच्या शिंदे गटाला केवळ १० जागा मिळाल्या आहेत. अद्याप घोषित व्हावयाच्या सात पैकी तीन जागा शिंदे गटाला मिळतात काय, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# नवमतदारांचा मतदानासाठी उत्साह

**। गडचिरोली । प्रतिनिधी ।**

माओवादग्रस्त व राज्यातील सर्वांत संवेदनशील गडचिरोलीत शुक्रवारी सकाळी सात वाजेपासूनच ठिकठिकाणच्या मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्या. लोकशाहीच्या सर्वांत मोठ्या उत्सवात नवमतदार उत्साहाने सहभागी झाले होते तर ज्येष्ठ नागरिकांनीही गर्दी केली होती.गडचिरोली- चिमूर लोकसभा मतदारसंघाच्या आखाड्यात १० उमेदवार आहेत. सहा विधनासभा क्षेत्रांचा यात समावेश आहे. १८९१ मतदान केंद्रांवर १६ लाख १८ हजार ६९० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात पुरुष मतदार ८ लाख १४ हजार ७६३ असून महिला मतदारांची संख्या ८ लाख २ हजार ४३४ आहे. तृतीयपंथी १० मतदार आहेत. संवेदनशील ३१९ मतदान केंद्रे असून माओवाद्यांकडून



घातपाती कारवाया होण्याची शक्यता असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने सुमारे १५ हजार जवानांचा फौजफाटा बंदोबस्त करण्यासाठी तैनात करण्यात आला आहे. गडचिरोलीसह आरमोरी, अहेरी तसेच गोंदिया जिल्ह्यातील आमगाव या चार विधानसभा क्षेत्रात सकाळी सात ते दुपारी तीन अशी मतदानाची मुदत आहे, तर चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी व चिमूर येथे सायंकाळी सात वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. गडचिरोली शहरासह दुर्गम - अतिदुर्गम भागात सकाळच्या टप्प्यातच मतदारांनी गर्दी केली. जिल्ह्यातील तापमान ४३ अंशावर पोहोचलेले आहे त्यामुळे अनेक मतदार सकाळीच मतदान करण्यासाठी घराबाहेर पडल्याचे चित्र दिसून आले. त्यात नवमतदार जास्त होते.

### ठाण्यात शेंडगेंना उमेदवारी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ओबीसींचा जिल्हा अशी ओळख असलेल्या ठाणे जिल्ह्यातील तिन्ही लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगणार असल्याची चर्चा असतानाच, प्रकाश अण्णा शेंडगे यांच्या ओबीसी बहुजन पार्टीने ठाणे लोकसभेच्या रिंगणात उमदेवार उतरविला आहे. ठाणे, कल्याण आणि भिवंडी या तिन्ही मतदारसंघात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगणार असल्याची चर्चा असून त्यातच आता प्रकाश अण्णा शेंडगे यांच्या ओबीसी बहुजन पार्टीने ठाणे लोकसभेच्या रिंगणात उमदेवार उतरविला आहे.

# जागा वाटपावर दिल्लीतील नेते नाराज

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुतीमध्ये जागावाटपावरून अंतिम निर्णय झालेला नाही. काही जागांवरून महायुतीत एकमत होत नसल्यामुळे राज्यातील काही जागांचा तिढा कायम आहे. मात्र, महायुतीतील शिवसेना शिंदे गट राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार आणि भाजपा या पक्षातील नेत्यांनी जागांवरुन केलेल्या दाव्यामुळे दिल्लीतील भाजपाचे पक्षश्रेष्ठी, नाराज असल्याचे बोलले जात आहे. महायुतीत चार ते पाच जागांचा अद्याप तिढा कायम आहे. या जागांवर महायुतीतील नेत्यांमध्ये एकमत होत नाही. त्यामुळे या जागांवर महायुतीत तिन्ही पक्षांकडून दावा करण्यात येत आहे. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षातील नेत्यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच या ठिकाणी आपल्या पक्षाचा दावाही करण्यात येत आहे. नाशिक, ठाणे या जागा शिवसेनेच्या वाट्याच्या आहेत. मात्र, नाशिक जागेवर राष्ट्रवादीने दावा केला असून, येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ यांना उमेदवारी मिळावी असा आग्रह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा आहे. तसेच दक्षिण मुंबईतून योग्य उमेदवार मिळत नसल्यामुळे या जागेवरील तिढा सुटत नाही आहे. येथे कुठला उमेदवार द्यावा हे महायुतीसमोर आव्हान आहे.

उमेदवारी आणि जागा वाटपावरून महायुतीतील नेत्यांची वेगवेगळी मत आणि त्यांच्या प्रतिक्रिया लोकांमध्ये जात आहेत. यामुळं लोकांमध्ये, मतदारांमध्ये एक वेगळा नकारात्मक मेसेज जाऊ शकतो. चुकीचा संदेश जाऊ शकतो. त्यामुळे भाजपाबद्दल किंबहुना महायुतीबद्दल लोकांच्या मनात गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते. नेत्यांच्या वेगळ्या बोलण्यामुळे आपल्यामध्येच एकी नसल्याचा चित्र लोकांमध्ये जाऊ शकतं. त्याचा परिणाम मतदानावर पडू शकतो, असे महाशक्तीने म्हटले आहे.

### शिवेंद्रराजेंची भूमिका ठरणार महत्त्वाची

**सातारा :** सातारा लोकसभा मतदारसंघात दोन्ही उमेदवार सातारा व जावळी तालुक्यांतील आहेत. आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले हे भाजपमध्ये असल्याने त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. शिवेंद्रसिंहराजे समर्थकांत उदयनराजेंबाबत काही प्रमाणात नाराजी आहे, तर जावळीचे भूमिपुत्र असल्याने शशिकांत शिंदे यांना सहानुभूती मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे उदयनराजे यांना सातारा, जावळीत विशेष लक्ष द्यावे लागेल. दोन्ही राजांचे मनोमिलन कार्यकर्त्यांपर्यंत आणि मतदारांपर्यंत पाझरणार का, यावर सर्व काही अवलंबून आहे.

# दादांच्या वक्तव्यामुळे चर्चांना उधाण

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राज्यात लोकसभा निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांनी प्रचार सभांचा धडाका लावला आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही प्रचार सभा घेत आहेत. यादरम्यान, तुम्हाला पाहिजे तेवढा निधी आम्ही देऊ, पण आमच्यासाठी मशीनमध्ये कचाकच बटन दाबा, असे विधान अजित पवार यांनी केले आहे. अजित पवार यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. दादा म्हणाले, आम्ही केलेल्या कामाला तुम्हाला फायदा होईल, पण जेव्हा तुम्हाला फायदा होईल तेव्हा कुणामुळे फायदा झाला हे विसरू नका. विकासकामासाठी लागेल तेवढा निधी आम्ही देऊ. पण जस आम्ही पाहिजेल तेवढा निधी देतो, त्याप्रमाणे मशीनमध्ये देखील कचाकचा बटण दाबा... म्हणजे मला निधी द्यायला बरं वाटेल. नाहीतर माझा हात आखडता येईल यांनी पुढे सांगितले की, जेव्हा जेव्हा संधी मिळाली तेव्हा मी कामे केली आणि करतो आहे. मला काम करायला आवडतात. मला आदेश द्यायची सवय झाली आहे त्यामुळे मी अधिकाऱ्यांना आदेश देत असतो पण कार्यकर्त्यांना आदेश द्यायचा नसतो. कार्यकर्त्यांना आदेश दिला तर ते मलाच घरी बसवतील. कार्यकर्त्यांशी नीट बोलावं लागत त्यांना सांभाळावे लागते, असे देखील अजित पवार म्हणाले. याचबरोबर, जो उमेदवार दिला आहे तिथल्या आमदार किंवा होऊ घातलेला आमदार असतो त्याला इच्छा असते खासदारांने ढवळाढवळ करू नये. मी ४० वर्ष झाली उमेदवाराला ओळखतो. ४० वर्षांपासून मी ओळखतो ते ढवळाढवळ करणार नाहीत ते बाहेरचे वाटणार नाही ते तुम्हाला आपले वाटतील. आम्ही केलेल्या कामाला तुम्हाला फायदा होईल. पण जेव्हा तुम्हाला फायदा होईल तेव्हा कुणामुळे फायदा झाला हे विसरू नका, असे अजित पवार म्हणाले.

# मतदान वाढविण्यासाठी सदिच्छादूतांची मदत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत राज्यातील मतदानाचा टक्का वाढावा यासाठी मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी कला, क्रीडा, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रांतील नामवंतांची मदत घेण्यात येणार आहे. त्यात अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर, अभिनेते प्रशांत दामले, महिला क्रिकेटपटू स्मृती मनधना आदी १६ मान्यवरांची सदिच्छादूत म्हणून निवड करण्यात आली आहे.



राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, पुणे आदी शहरी भागांतील मतदानाची घटती टक्केवारी ही निवडणूक आयोगासाठी चिंतेची बाब आहे. यंदाही मतदान कमी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आयोगाने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

### मोदींच्या खुर्च्यांवर गांधींचे स्टिकर्स

**नाशिक :** विदर्भात दुसऱ्या टप्प्यात होऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. महायुतीतील उमेदवाराच्या प्रचारार्थ मोदी १९ एप्रिलला वर्ध्यात येणार होते. वर्धा, अमरावतीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मोदींच्या खुर्चीवर राहूल गांधीचे स्टिकर पाहयला मिळाल्याने चर्चा होताना दिसत आहे.

# राणांसाठी जनतेतील लढाई कठीण

**। अमरावती । प्रतिनिधी ।**

अमरावती लोकसभा मतदारसंघात भाजप, काँग्रेस आणि प्रहार जनशक्ती पक्षात चुरशीची लढत होत आहे. गेल्या निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर अपक्ष निवडून आलेल्या नवनीत राणा यांनी गेली पाच वर्षे केंद्र सरकारला दिलेला पाठिंबा, भाजपमध्ये नाट्यमय प्रवेश, लगेच उमेदवारी आणि जात प्रमाणपत्र प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला दिलासा, यामुळे आत्मविश्वास दुणावलेल्या राणांना जनतेच्या न्यायालयात अग्निदिव्य पार करावे



लागणार आहे. गेल्यावेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या मतपेढीचा आधार त्यांना मिळाला होता. आता भाजपच्या परंपरागत मतांखेरीज विविध जात समूहांना आपल्याकडे खेचण्यासाठी त्यांना जोरदार प्रयत्न करावे लागत आहेत. अमरावती मतदारसंघात ३७ उमेदवार रिंगणात असून बहुसंख्य कुणबी-मराठा मतदारांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. राणा यांना गेल्या निवडणुकीत ५ लाख १० हजार ९४७ मते मते मिळाली होती. मोदी लाटेतही अपक्ष म्हणून निवडून आल्याने त्यांचे कौतुकही झाले होते. त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे आनंदराव अडसूळ यांना ४ लाख ७३ हजार ९९६ मते प्राप्त झाली होती. जिल्ह्यातील सर्व राजकीय नेत्यांशी वैरत्व, पक्षांतर्गत नाराजी, दलित आणि मुस्लिमांचा निसटलेला जनाधार या बाबी त्यांच्यासाठी अडचणीच्या बनल्या आहेत.

### पुण्यात प्रचाराची रणधुमाळी

**पुणे :** महाविकास आघाडीच्या उमेदवार खा. सुप्रिया सुळे, पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर, शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे, याच्या प्रचार सभा होणार असून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्याची तयारी करण्यात आली आहे. शरद पवार, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, माजी बाळासाहेब थोरात, संजय राऊत, संपर्क प्रमुख सचिन आहिर उपस्थितीत महाविकास आघाडीची सभा होणार आहे.

# अशोक चव्हाणांच्या सभेत राडा

## मराठा बांधव आक्रमक, सभा थांबवून स्वीकारलं निवेदन

**। नांदेड । प्रतिनिधी ।**

काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केलेले माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना मराठा समजाच्या रोषाचा सामना करावा लागत आहे. चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यापासून मराठा समाज बांधव त्यांच्याकडे आरक्षणाच्या मुद्दयावरुन जाब विचारत आहेत. राज्यात आणि केंद्रात सध्या भाजपाप्रणित आघाडीची सत्ता आहे. त्यातच,भाजपात प्रवेश करताच अशोक चव्हाण यांना राज्यसभेची खासदारकीही देण्यात आली. त्यामुळे, मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा सोडविण्यासाठी



समाज बांधवांकडून अशोक चव्हाणांना पोटतिडकीने जाब विचारला जात आहे. लोकसभा निवडणुकांसाठी ते सध्या गावदौर आणि प्रचार सभांमधून पंतप्रधान मोदींना पंतप्रधान बनविण्याचं आवाहन करत आहेत. त्यावर, समाजाच्या भावना तीव्र होतानाचे दिसून येते. चव्हाण यांच्यावर भाजपाने नांदेडची जबाबदारी दिली असून नांदेडचा खासदार विजयी करण्यासाठी चव्हाण मतदारसंघात फिरत आहेत. मात्र, यापूर्वीच मराठा समाज बांधवांनी चव्हाण यांची गाडी अडवल्याचं सर्वांना पाहिलं होतं. आता, पुन्हा एकदा त्यांच्यावर मराठा समाजाच्या रोषाची नामुष्की ओढावली आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार खा. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ सभांचं आयोजन केलं जात आहे. मुखेड तालुक्यातील जांब येथे गुरुवारी रात्रीमहायुतीची प्रचारसभा सुरू असताना सकल मराठा समाजाचे काही बांधव सभेत आले. या मराठा बांधवांनी एक मराठा, लाख मराठा अशी घोषणाबाजी करत, मराठा आरक्षणांसदर्भात चव्हाण यांना जाब विचारला. त्यामुळे, काही वेळेसाठी खासदार महोदयांना आपली सभा थांबवावी लागली होती.

**बांधवांची घोषणाबाजी**

**मराठा आरक्षणासाठी आपण गप्प का?, मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, असे प्रश्न करत मराठा बांधवांनी एक मराठा लाख मराठा अशी घोषणाबाजी केली. यावेळी, अशोक चव्हाण यांनी काही वेळ आपली सभा थांबवावी लागली. भाजपातील मराठा समाजाच्या नेत्यांना, आमदार-खासदारांना मराठा समाजा रोषाचा सामना करावा लागत आहे.**

# निवडणुकीत अवैध पैसा जप्त

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

१ मार्च ते १३ एप्रिल २०२४ या कालावधीमध्ये देशभरामधून निवडणूक आयोगाने वेगवेगळ्या कारवायांमध्ये ४ हजार ६५८ कोटी १३ लाख रुपये जप्त केले आहेत. यामध्ये रोख रक्कमेबरोबरच सोने-चांदी, दारु, अंमली पदार्थ, मौल्यवान वस्तूंचा समावेश असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. भारतामध्ये १९५२ सालापासून सुरु झालेल्या निवडणुकीच्या इतिहासात जप्त केलेल्या रक्कमेच्या आकडेवारीनुसार आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई आहे. २०१९ च्या निवडणुकीच्या कालावधीमध्ये एकूण ३ हजार ४७५ कोटी रुपये जप्त करण्यात आले होते.

# अकोल्यात चुरशीची तिरंगी लढत

**। अकोला । प्रतिनिधी ।**




अकोला लोकसभा मतदारसंघात भाजप, वंचित व काँग्रेसमध्ये काट्याची लढत आहे. गेल्या दोन निवडणुकांमध्ये धार्मिक रंग चढल्याने भाजपने एकतर्फी वर्चस्व राखले होते. यावेळेस मात्र प्रमुख तीन उमेदवारांमधील मतविभाजनाचे गणित निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत. वंचित व काँग्रेसपुढे इतिहास बदलण्याचे, तर भाजपपुढे वर्चस्व राखण्याचे आव्हान आहे.

अकोला मतदारसंघात १५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. १९९८ व १९९९ च्या निवडणुकांचा अपवाद सोडल्यास अकोला लोकसभा मतदारसंघात गत साडेतीन दशकांपासून तिरंगी लढत झाली. तिरंगी लढत नेहमीच भाजपच्या पथ्यावर पडल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. काँग्रेसने २०१४ व २०१९ मध्ये अल्पसंख्याक उमेदवार दिल्याने धर्माच्या आधारावर लढतीचे समीकरण रंगले होते. त्काँग्रेसने अकोल्यात मराठा समाजातील डॉ. अभय पाटील यांना रिंगणात उतरवले आहे. भाजपचे अनुप धोत्रे, काँग्रेसचे डॉ. अभय पाटील व वंचितचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यात तुल्यबळ लढत होत आहे. मतदारसंघात मराठा मतदारांचे प्राबल्य आहे. काँग्रेसच्या प्रयोगामुळे यावेळेस मतदारसंघातील निवडणुकीत रंगत आली.

## वे|ध|क

# अनंत गीतेंना मिळणार आघाडी

### शेकाप तालुका चिटणीस वसंत यादव यांचा विश्वास

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचाराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मतदारांसह कार्यकर्ते स्वंयस्फुर्तीने सभा, बैठकांना हजेरी लावून गीतेंना पाठींबा देत आहेत. त्यामुळे या लोकसभेच्या निवडणूकीत अनंत गीते यांनाच श्रीवर्धनमधून आघाडी मिळणार असा विश्वास शेकाप तालुका चिटणीस वसंत यादव यांनी व्यक्त केला.



श्रीवर्धन तालुक्यामध्ये रोजगाराचा प्रश्न अजूनही कायम आहे. अनेक तरुण नोकरी व्यवसायानिमित्त मुंबईला जात आहे. ग्रामीण भागात पाण्याचा प्रश्नही गंभीर आहे.

मात्र या प्रश्नांकडे पाहिजे तसे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे सुनील तटकरे यांच्याबद्दल अनेकांमध्ये नाराजीचे सुर आहेत. लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीतून अनंत गीते यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यात मतदारांनी आनंदोत्सव साजरा केला. अनंत गीते यांनी गावोगावी जाऊन मतदारांसह कार्यकर्त्यांसोबत संवाद साधला जात आहे. जनसंवाद सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. शेकाप, शिवसेना (उध्दव ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), कॉंग्रेस यांच्यासह अन्य घटक पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते गीते यांना निवडून देण्यासाठी कामाला लागले आहे.

अनंत गीते यांना मुस्लीम समाजासह कुणबी समाजाकडूनही चांगला पाठींबा मिळत असून शेतकरी कामगार पक्षा इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या निवडणूकीत श्रीवर्धनधून गीतेच आघाडी मारतील असा विश्वास शेकाप तालुका चिटणीस वसंत यादव यांनी व्यक्त केला.

# महाविकास आघाडीला विजयी करा -महेंद्र घरत




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

हुकूमशाही पद्धतीच्या राजवटीला उलथून टाकण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन रायगड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी कार्यकर्त्यांना केले.

मावळ व रायगड लोकसभा निवडणूक २०२४ च्या प्रचारासंदर्भात कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांची बैठक व पत्रकार परिषद शेलघर येथील समाज मंदिर हॉल येथे घेण्यात आली होती. त्यावेळी घरत हे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, कॉंग्रेसचे पनवेल तालुका अध्यक्ष नंदराज मुंगाजी, कॉंग्रेसच्या रायगड महिला अध्यक्षा श्रद्धा ठाकूर, महिला तालुका अध्यक्षा रेखा घरत आदी उपस्थित होते.

महेंद्र घरत म्हणाले की, देशामध्ये मोदी सरकार विरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ही निवडणूक हुकूमशाही विरुद्ध लोकशाही आणि संविधान वाचविण्यासाठी आहे. हे सर्वसामान्य जनतेच्या लक्षात आले आहे.त्यामुळे या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा जनताच दाखवील असा विश्वास महेंद्र घरत यांनी व्यक्त केला. गलिच्छ राजकारणाविरोधात ही लढाई आहे. महायुतीचा पराभव घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी निष्ठेने कामाला लागावे. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# लीना गरड, मधु पाटील यांचा जाहीर सत्कार




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर येथील शिवसेना पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तथा मावळ लोकसभा समन्वयक केसरीनाथ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केलेल्या कॉलनी फोरम अध्यक्षा लीना गरड, मधू पाटील, कामोठे कॉलनी फोरम अध्यक्ष मंगेश आढाव, मनोज सोम वंशी, मनसेचे माजी जिल्हाउपाध्यक्ष ॲड. प्रशांत अनगुडे यांचा सत्कार समारंभ व सुसंवाद मेळावा खारघर येथे पार पडला.खारघर फोरम ही संस्था शिवसेना पक्षात आल्यामुळे पनवेल विधानसभेमध्ये शिवसेनेची ताकद निश्चितपणे वाढेल. आणि त्याचा फायदा येत्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार संजय वाघेरे यांना होईल असे केसरीनाथ पाटील यांनी सांगितले.

# संजोग वाघेरे यांना एबी फॉर्म सुपूर्द

**पनवेल :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांना शिवसेना उपनेते तथा पुणे जिल्हा संपर्क प्रमुख आ. सचिन अहिर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये फॉर्म सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी मावळ लोकसभा समन्वयक केसरीनाथ पाटील, रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत, जिल्हा संपर्क प्रमुख बबन पाटील, माजी आ. मनोहर भोईर, पुणे जिल्हाप्रमुख गौतम चाबुस्कवर आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# जिल्हा प्रशासनाची मतदान केंद्रांवर नजर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड लोकसभा मतदार संघातील मतदान येत्या ७ मे रोजी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पुन्हा मतदान केंद्राची पाहणी केली जाणार आहे. मात्र काही मतदान केंद्र म्हणजे जिल्हा परिषद शाळांमधील वीज बील थकल्याने त्यांचे वीज कनेक्शन तोडले आहे. त्यामुळे मतदान केंद्रातील कर्मचारी व मतदारांची गैरसोय होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. शनिवारपासून मतदान केंद्राची पाहणी करणारी समिती हा प्रश्न सोडविण्यास यशस्वी ठरतील का असा सवाल उपस्थित केला जात आहे.**

> जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार शनिवारपासून पुन्हा पथकांमार्फत मतदान केंद्राची अंतिम पाहणी होणार आहे. मतदान केंद्रात असलेल्या गैरसोयीची माहिती घेऊन त्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला जाणार आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.
>
> –संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड

रायगड लोकसभा मतदार संघात १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. यामध्ये पुरुष आठ लाख १३ हजार ५१५, महिला आठ लाख ४० हजार ४१६, तृतीय पंथी चार, दिव्यांग आठ हजार ४६, ८५ वयोगटापेक्षा ३१ हजार २८ तर १८ ते १९ वयोगटातील १६ हजार २८८ मतदारांचा समावेश आहे.

उमेदवारी अर्जाची छाननी २० एप्रिल रोजी होणार आहे. अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया २२ एप्रिल त्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. रायगड लोकसभा मतदार संघात दोन हजार १८५ मतदान केंद्र आहेत.त्यात सहा संवेदनशील मतदान केंद्र आहेत. मतदान सात मे रोजी होणार असून मतमोजणी चार जूनला होणार आहे.

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांमार्फत मतदान केंद्रांची पाहणी करण्यात आली होती.

मतदान येत्या ७ मेला आहे. त्यासाठी अवघे १५ दिवस शिल्लक आहेत. मतदान केंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसह मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना योग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पथकामार्फत शेवटच्या टप्प्यातील पाहणी केली जाणार आहे. शनिवारपासून पथके जिल्ह्यातील वेगवेगळ्या मतदान केंद्राला भेटी देणार आहे. मतदान केंद्रामध्ये वीज, पाणी व इतर सुविधा उपलब्ध आहेत, की नाही, याची पाहणी करणार आहेत. सुविधा उपलब्ध नसल्यास त्याठिकाणी तात्काळ सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या जाणार आहेत. अलिबाग तालुक्यातील बेलोशी ग्रामपंचायत हद्दीतील आठ जिल्हा परिषद शाळांमधील विज बील थकले आहे. महावितरण कंपनीने वीज पुरवठा बंद केला आहे. या शाळा मतदान केंद्र म्हणून घोषित करण्यात आले आहेत. वीज पुरवठा खंडीत झाल्याने पाणीदेखील याठिकाणी नाही. मतदान केंद्राची पाहणी करण्यासाठी येणारे पथक मतदान केंद्रातील हे प्रश्न मार्गी लावण्यास यशस्वी ठरतील का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली मतदान केंद्राची पहाणी



**। म्हसळा । वार्ताहर ।**

निवडणूक निर्णय अधिकारी रायगड लोकसभा मतदारसंघातील ग्रामिण भागातील मतदान केंद्राना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जवळे यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन मतदान केंद्राची पाहणी करून सुविधा उपलब्धतेबाबत सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी रायगड यांनी नुकतीच १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदार संघांमधील म्हसळा तालुक्यातील २३३- घोणसे मतदान केंद्राची पाहणी केली व मार्गदर्शन केले. तसेच अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूलमध्ये रिक्षा व मिनीडोर संघटनेचे चालक यांना मतदान जनजागृतीच्या स्टिकर्सचे वाटप करून मतदान टक्का वाढविण्यासाठी आवाहन केले. याप्रसंगी त्यांच्या समवेत उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन महेश पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.विवेक मुगळीकर, म्हसळा तहसीलदार समीर घारे, तहसीलदार श्रीवर्धन महेंद्र वाकलेकर, तहसीलदार तळा स्मिता पाटील, निवासी नायब तहसीलदार म्हसळा गणेश तेलंगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हसळा पवन चौधरी, मंडळ अधिकारी सलीम शहा, ग्रामस्थ, रिक्षा व मिनिडोर संघटनेचे पदाधिकारी व रिक्षा चालक उपस्थित होते.

# निगडीत मतदार जागृती कार्यक्रम



**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा तहसीलदार धर्मराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निगडी येथे बुधवारी (दि.१७) स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती करण्यात आला. कार्यक्रमासाठी निगडी गावातील बहुतांश मतदार उपस्थित होते. धर्मराज पाटील यांनी इव्हीएम मशीन बाबतीचा मतदाराच्या मनातील गैरसमज दूर करून मतदानाच अधिकार बजावा असे मतदारांना आवाहन केले.

धोंडगे यांनी गाण्यातून उद्‌बोधन केले. शालेय विद्यार्थ्यांकडून पालकांसाठी मतदान जनजागृती संबंधी पत्रलेखन तसेच ग्रामस्थांकडून संकल्पपत्र लिहून घेण्यात आले. यावेळी महसूल तहसीलदार धर्मराज पाटील, मंडळ अधिकारी सलीम शाह, सचिन धोंडगे, वेदिका पाखड, रमेश काप, रफिक हद्दादी, महादेव पाटील, गणुजी बारे, गोरखनाथ माने, रमेश जाधव, जयवंत मोरे, मिलिंद मोरे, प्रणिता काप, स्वप्निल मांडले, अजिंक्य पाटील, प्रणाली बेडसे, पूजा रानगे, ज्योती चौगले, अनुसया पाखड अंगणवाडी मदतनीस विद्यार्थी पालक व गावातील इतर ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणाली बेंडसे आणि सूत्रसंचलन रमेश जाधव यांनी केले.

## संकुलांमध्ये सिडकोकडून मतदान जनजागृती

**वाशी :** यंदाच्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकारी आणि कार्यकारिणी समित्यांना जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन सिडकोच्या वतीने करण्यात येत आहे.

निवडणूक पार्श्वभूमीवर सिडकोतर्फे गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकारिणी समिती सदस्यांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. त्यांनी आपल्या गृहनिर्माण संस्थांतील रहिवाशांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याकरिता संस्थेच्या आवारात भित्तीपत्रके, निवडणुकीविषयी सूचना प्रसिद्ध कराव्यात. अन्य माध्यमांद्वारेही जनजागृती करून संस्थेतील रहिवाशांना मतदानाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रोत्साहित करावे, अशा सूचना दिल्या आहेत.

## लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

भारत निवडणूक आयोगाने ३२ रायगड लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक (सर्व साधारण), निवडणूक निरीक्षक (पोलीस) आणि निवडणूक निरीक्षक (खर्च) यांची नियुक्ती केली आहे. हे सर्व निवडणूक निरीक्षक संपूर्ण निवडणूक कालावधीत शासकीय विश्रामगृह अलिबाग येथे पूर्वनियोजित भेटीसाठी दुपारी बारा ते एक या वेळेत उपलब्ध असणार आहेत.

संजीव कुमार झा, निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) असून त्यांचा संपर्क क्रमांक-९६९९९७६८११ असा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता उपेंद्र दीक्षित आहेत. जिल्ह्यातील निवडणूक संबंधित सर्वसाधारण बाबी पाहणार आहेत.

जोयस लालरेम्मवी निवडणूक निरीक्षक (पोलीस) यांचा संपर्क क्रमांक-९०२२७४२२४० आहे. त्यांचे संपर्क अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक अजित गोळे आहेत. जिल्ह्यातील निवडणूक संबंधित कायदा व सुव्यवस्था विषयक बाबी ते पाहणार आहेत.

खर्च निरीक्षक म्हणून धिरेंद्रमणी त्रिपाठी यांचा संपर्क क्रमांक-९३७३३६४५३२ आहे. सहायक संचालक लोकल फंड प्रवीण वडगाये त्यांचे संपर्क अधिकारी आहे. ते निवडणूक खर्चविषयक बाबी पाहणार आहेत. ही सर्व माहिती नागरिक व मतदारांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

# नामसाधर्म्यामुळे तटकरे अडचणीत येण्याची शक्यता

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघातील निवडणुकीत महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या नावाचे साधर्म्य असलेले सुनील तटकरी नावाने आणखी एकाने अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या निवडणुकीत साधर्म्य नावामुळे महायुतीचे तटकरे अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



सुनील तटकरे यांचा प्रचार सुरु आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्यासोबत त्यांची लढत होणार आहे. अनंत गीतेंना अडचणीत टाकण्यासाठी त्यांच्या नावाने साधर्म्य असलेल्या दोन व्यक्तींनी उमेदवारी अर्ज सोमवारी दाखल केला. मात्र यामध्ये सुनील तटकरेंनादेखील अडचणी येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

सुनील तटकरे यांच्या नावाने साम्य असलेले सुनील तटकरी यांनीदेखील उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सुनील तटकरी यांच्या नावामुळे सुनील तटकरे यांची मते विभागण्याची शक्यता आहे.

सुनील तटकरेंनी अनंत गीते यांच्याविरोधात राजकीय खेळी सुनील तटकरेंनाच भोवणार असल्याचे बोलले जात आहे. एकाच नावाने दोन ते तीन व्यक्ती लोकसभा निवडणुकीत उभे राहिले आहेत. या निवडणुकीत अधिक रंगत वाढणार आहे.

# महाडमध्ये भाजप कार्यकर्ते प्रचारापासून दूर

**। महाड । वार्ताहर ।**

रायगड लोकसभा मतदार संघात भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि आरपीआय महायुतीचे उमेदवार म्हणून राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे मैदानात उतरले आहेत. मात्र, त्यांच्या महाड तालुक्यात आजवर ज्या सभा झाल्या, त्या सभांपासून किरकोळ अपवाद वगळता भाजपचे कार्यकर्ते दूरच राहात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. भाजपचा उमेदवार मैदानात नसल्याची तर ही नाराजी नाही ना, अशी चर्चा त्यामुळे सुरु झाली आहे.

सुनील तटकरे यांनी महाड विधानसभा मतदार संघात आतापर्यंत दोन सभा घेतल्या आहेत. अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत एक सभा झाली. दुसरीकडे भाजपचे नेते आ. प्रवीण दरेकर यांनी महाड शहरात भाजपचे प्रमुख पदाधिकारी, बुथ प्रमुख, वॉरियर यांची सभा घेतली.

प्रवीण दरेकर यांनी घेतलेली सभा ही भाजपपुरती मर्यादित असली, तरी भाजप कार्यकर्त्यांकडून या सभेस फारसा प्रतिसाद मिळाला नाही. चवदार तळे सभागृहाच्या प्रांगणात घेण्यात आलेल्या या सभेला जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहिले असले, तरी त्यांच्यासमोरच्या निम्म्याअधिक खुर्च्या रिकाम्या होत्या. चवदार तळे परिसरातील भाजप कार्यकर्ते जरी या सभेला उपस्थित राहिले असते, तरी हे प्रांगण खच्च भरले असते अशी उद्विग्न प्रतिक्रिया भाजपच्याच एका पदाधिकाऱ्याने प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली. ही प्रतिक्रिया बोलकी ठरावी.

सुनील तटकरे यांनी महाड तालुक्यात लाडवली येथे नाते जिल्हा परिषद गटाची, तर रेवतळे फाटा येथे करंजाडी जिल्हापरिषद गटाची सभा घेतली. लाडवली येथील सभेला महेश शिंदे हे भाजपचे एकमेव पदाधिकारी उपस्थित होते. भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर हे महाडचे आहेत. लाडवली येथील सभेच्या दिवशी त्यांचा वाढदिवस असल्याने ते उपस्थित राहिले नसल्याचा खुलासा करण्यात आला. ते आणि भाजपचे तालुकाध्यक्ष जयवंत दळवी हे दोघेही आजारी असल्याने प्रचारात सहभागी होत नसल्याचे सांगितले जात आहे. ते खरेदेखील आहे. मात्र, भाजपचे नेते म्हणून ज्यांची ओळख आहे, असे कोणतेही नेते लाडवली, दासगांव आणि रेवतळे फाटा येथील सुनील तटकरे यांच्या प्रसारसभांमध्ये दिसून आले नाहीत. भाजपचे कार्यकर्ते म्हणवणाऱ्यांनीही या सभांकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले.

## पनवेलमध्ये घरोघरी प्रचाराला वेग

**खारघर :** विविध पक्षांकडून खारघर, तळोजा आणि कामोठे वसाहतीमध्ये प्रचाराचा नारळ फोडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रचार रॅली काढण्यात येत आहे.मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल विधानसभा मतदारसंघात पाच लाख ७० हजार मतदार आहेत. पनवेल महापालिका हद्दीतील खारघर, तळोजा, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल आदी सिडको वसाहतींत मतदार संख्या अधिक आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून विविध मुद्दे समोर आणून प्रचार करण्यात येत आहे. विरोधकांकडून येथील समस्या मांडण्यात येत आहेत; तर सत्ताधाऱ्यांकडून विविध विकासकामांचा लेखाजोखा देण्यात येत आहे.

# मतदानासाठी हस्ताक्षर, शपथ अभियान

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ मध्ये मतदारांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रबोधन करणे व निवडणुकांमध्ये निर्भयपणे कोणत्याही प्रलोभनाच्या प्रभावाखाली न येता मतदान करणे या दृष्टीने स्वीप अंतर्गत शहरभर हस्ताक्षर व शपथ अभियान राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने शहरात विविध ठिकाणी जनजागृतीचे बॅनर लावण्यात आले असून नागरिकांना मतदार शपथ देण्यासाठी व हस्ताक्षर घेण्यासाठी शहरातील मतदान बुथ, मुख्य चौक, बाजारपेठ, शासकीय कार्यालय, शाळा, आदिंसह ठिकाणी फिरविण्यात येत आहेत. मोहिमेची सुरुवात नगरपरिषद कार्यालय येथून नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी-पंकज भुसे यांचे हस्ताक्षर करण्यात आली. नागरिकांनी येणाऱ्या निवडणुकीत उत्स्फूर्तपणे व निर्भयपणे आपल्या मतदानाचा हक्क बजावावा व योग्य उमेदवारास निवडून देऊन देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी-पंकज भुसे यांनी केले.

याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, राकेश पाटील, मनोज पुलेकर, कपील वेहले, सतेज निमकर, पल्लवी डोंगरीकर, सुदेश माळी, दिप्ती एरंडे, अभिजीत चांदोरकर, नगरपरिषद सर्व कर्मचारी, शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

# मतदारराजा बारणेंच्या अहंकाराचा अंत करणार

**। रसायनी । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्याबद्दल केलेल्या विधानाचा संजोग वाघेरे यांनी शेलक्या शब्दात समाचार घेतला आहे.




## संजोग वाघेरेंची टीका

कासारवाडी येथे झालेल्या महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत श्रीरंग बारणे यांनी, माझ्या विरोधात कोण उमेदवार आहे, हे मला माहीत नाही, असे विधान करत संजोग वाघेरे यांना महत्व देत नसल्याचे दाखवून दिले होते. परंतु, आता बारणे यांच्या विधानाचा संजोग वाघेरे यांनी खरपूस समाचार घेतला आहे. इतकेच नाहीतर वाघेरेंनी बारणेंवर जहरी टीका सुद्धा केली आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघात सध्या महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्यांकडून जोरदार प्रचार सुरु आहे. दोन्ही बाजूंनी युती आणि आघाडीत घटक पक्षांचे मेळावे घेणे, पदाधिकाऱ्यांशी संवाद करणे या प्रक्रियेला जोर आल्याचे दिसत आहे. त्यामुळे जिथे जिथे शक्य होईल, तिथे तिथे दोन्ही उमेदवार एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसतात.

बारणे यांचे विधान हे बालिशपणाचे असून १९८७ सालापासून मी राजकारणात आणि समाजकारणात कार्यरत आहे. आम्ही दोघेही एकाच मतदारसंघात आहोत. तरी ते मला ओळखत नसतील तर तो त्यांचा अहंकार आहे. अशा शब्दात वाघेरे यांनी बारणेंचा समाचार घेतला. इतकेच नाही तर संजोग वाघेरे यांनी रावणाचे उदाहरण देत रावणाचा देखील अहंकार जळून खाक झाला होता. रावणाची लंका शेवटी जळाली होती हे बारणेंनी विसरू नये. बारणेंच्या अहंकाराचा मतदार अंत करतील, असा विश्वास संजोग वाघेरे यांनी व्यक्त केला.

## बचतगटांच्या गृहभेटी

**पनवेल :** सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवरतीस्वीपकार्यक्रमांतर्गत तळोजामध्ये बचतगटांमधील महिलांच्या बैठकीमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली. तसेच देवीचा पाडा, मुर्बी गाव, पालेखुर्द, करवले गाव, कळंबली, लोखंडी पाडा, तक्का गाव याठिकाणी नागरिकांच्या बैठका घेऊन मतदान जनजागृती करण्यात आली. तसेच पनवेमधील ख्वाजानगरी झोपडपट्टी याठिकाणी घरोघरी जाऊन पत्रके देऊन मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात आली.

# आघाडीची घोडदौड

लोकसभेच्या मतदानाच्या फेऱ्या १९ एप्रिलला सुरू होतील. त्याच्या आधीपर्यंत सर्वेक्षणे करायला परवानगी आहे. त्यानुसार सध्या विविध अंदाज येत आहेत. एबीपी माझा व सी व्होटर या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार, राज्यात महायुतीला ३१ तर महाविकास आघाडीला १७ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त केलेला आहे. विदर्भातल्या पहिल्या पाच जागा वगळता अजून राज्यातील प्रचाराला पुरेशी गती आलेली नाही. महायुतीने अनेक जागांवर आपले उमेदवारही जाहीर केलेले नाहीत. फार काय, संभाजीनगर, रत्नागिरी, ठाणे, नाशिक, पालघर, ठाणे, दक्षिण मुंबई आणि वायव्य मुंबई या जागा भाजप लढवणार की शिंदे गट याबाबतही अजून घोळ चालू आहेत. दोन्ही बाजू आपापल्या बाजूंवर ठाम आहेत. साताऱ्याची जागा आता जाहीर झाली असली तरी सर्वेक्षण झाले तेव्हा ती भाजप लढवणार की राष्ट्रवादी हे ठरायचे होते. एकूण महायुतीमध्ये बराच गोंधळ असूनही या सर्वेक्षणामध्ये त्यांना तब्बल ३१ जागा देण्यात याव्यात हे मनोरंजक आहे. अशी सर्वेक्षणे हादेखील प्रचाराचा एक भाग आहे की काय असेही अनेकांना वाटू शकेल. या सर्वेक्षणांमधून आपली ताकद वाढवून दाखवायची तसेच काही जागांवर विरोधक जिंकताहेत असे दाखवून त्यांना गाफील ठेवायचे असे डावपेच यामागे नसतीलच असे ठामपणे सांगता येत नाही. मोदींचा भाजप मिडिया व जनता यांच्यावर प्रभाव टाकण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो. खुद्द अमित शाह यांनी पूर्वी उत्तर प्रदेशातील एक मेळाव्यात याची कबुली दिली होती. अफवा आपले कार्यकर्ते कसे झटपट पसरवू शकतात व त्याचा कसा उपयोग होऊ शकतो हे त्यांनी मोठ्या गौरवाने सांगितले होते. त्यातच महाराष्ट्राने भाजपला गेल्या काही काळात चांगलाच इंगा दाखवला आहे. फोडाफोडी करून आपण हे राज्य सहज खिशात टाकू असे मोदी व शाह यांना वाटत होते. पण मराठी समाजाने त्यांना दाद दिलेली नाही.

### महायुतीबद्दल चीड

गेल्या दहा महिन्यांच्या काळात महाराष्ट्राबाबत एबीपी, आजतक, टीव्ही९ व इतरही माध्यमांनी बरीच सर्वेक्षणे केली. त्यांच्या अंदाजांमध्ये आकडे मागेपुढे झाले असतील. पण महाविकास आघाडीला राज्यात ४८ पैकी किमान पंधरा तर कमाल तीस जागा मिळू शकतात असे या सर्वेक्षणांमधून दिसले आहे. कित्येकदा हे अंदाज आल्यानंतर भाजपने आपल्या डावपेचांमध्ये आणखी बदल केले असेही दिसले आहे. महाराष्ट्र बधत नाही असे दिसल्यावर दिल्लीश्वरांनी आणखी फोडाफोडी केली आहे किंवा इडीच्या कारवाया वाढवल्या आहेत. अशोक चव्हाण किंवा रवीन्द्र वायकर यांच्यासारख्यांचे भाजपप्रवेश किंवा त्यापूर्वी मिलिंद देवरा यांच्यासारख्याचे शिंदे गट-प्रवेश हे नेमके अशाच एखाद्या सर्वेक्षणानंतर घडले आहेत. आजतकच्या पहिल्या सर्वेक्षणामधम्ये महाविकास आघाडीला तीस जागा मिळतील असा अंदाज व्यक्त झाला होता. आता आघाडीच्या जागा ताज्या सर्वेक्षणामध्ये अठरापर्यंत खाली आलेल्या दाखवल्या जात आहेत. अशा अंदाजांमधून जागा कमी करून वास्तव बदलेल काय हा मोठाच प्रश्न आहे. आज राज्यातील पक्ष फोडणाऱ्या भाजपबाबत प्रचंड चीड आहे. त्यामुळे जनता या पक्षफोड्यांना धडा शिकवण्याची संधी शोधत आहे. दुसरे म्हणजे मोदी सरकार हे नुसते हवेत गप्पा मारणारे सरकार आहे हेही लोकांना कळून चुकले आहे. शेतकऱ्यांना चार पैसे मिळण्याची आशा निर्माण झाली की शेतमालाचे भाव पाडण्यासाठी हे सरकार सरसावते. कांदा, सोयाबीन, ऊस या सर्व शेतकऱ्यांनी हा अनुभव घेतला आहे. दुसरीकडे सरकारी नोकऱ्यांची संख्या कमी होते आहे. सरकार केवळ हिंदू-मुस्लिम भांडणे लावण्यात मग्न आहे. कोरोनाच्या काळात लोक रस्त्यावर मेले तरीही हे सरकार लोकांना फुकट लस द्यायला राजी नव्हते. सर्वोच्च न्यायालयाने ते त्याला करणे भाग पाडले. जगभरात पेट्रोलचे दर कमी होऊनही भारतात मात्र ते सतत वाढत राहिले व आज ते शंभरच्या वर आहेत. याचा भरपूर फटका लोकांना बसलेला आहे.

### मोदींच्या नावे जोगवा

भाजपविरुध्दची ही नाराजी लपवण्यासाठी सरकार बरीच जुमलेबाजी करण्याचा प्रयत्न करीत आहे. जगात देशाची मान उंचावली वगैरे बाता मारल्या जात आहेत. शिवाय २०४७ ला भारत प्रगत होणार असल्याची स्वप्ने दाखवली जात आहेत. आता २०२४ मध्ये आयुष्य कसे काढायचे, नोकऱ्या कुठे मिळणार या प्रश्नांना मात्र बगल देण्याचा प्रयत्न होत आहे. त्यासाठीच आता मोदींच्या नावाने मते मागितली जात आहेत. उमेदवार कोणीही असो मोदींसाठी मतदान करा असे सांगत भाजपवाले फिरत आहेत. फार कशाला, परवा, बारामतीची लढाई देखील मोदी आणि राहुल गांधी यांच्यातील आहे असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. अजित पवारांच्या नावावर मते मिळण्याची शक्यता दिसत नाही असे म्हटल्यावर हा उपाय काढण्यात आला आहे. गंमत म्हणजे आता भाजपच्या तिकिटावर उभ्या राहिलेल्या नवनीत राणा यांनीच हा दावा खोडून काढला आहे. मोदींची लाट आहे व आपण सहज विजयी होऊ अशा गैरसमजात राहू नका असे त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना काल बजावले. इतकेच नाही तर २०१९ मध्ये मोदींच्या लाटेच्या विरोधात देखील माझ्यासारखी अपक्ष महिला निवडून येऊ शकली होती असा दाखला त्यांनी दिला. मोदींच्या नावे मते मिळायला महाराष्ट्र म्हणजे गुजरात किंवा उत्तर प्रदेश नव्हे असाच यातला स्पष्ट संदेश आहे. या सर्वेक्षणांवरूनही तेच सत्य पुढे येत आहे. आकडे कमी-जास्त होतील. पण महाराष्ट्रात एकतर्फी विजय तर सोडाच पण बहुमत मिळवणेही भाजपला शक्य होणारे नाही. एबीपीच्या सर्वेक्षणामध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला एकही जागा मिळणार नाही असे दाखवले आहे. दुसरीकडे शिंदे गटावर मराठवाड्यात देखील हीच वेळ येणार आहे. पक्षफोडे व सत्तेसाठी फितूर झालेले यांच्याबाबत जनतेत अजिबात सहानुभूती नसल्याचे हे निदर्शक आहे. मुंबई व कोकणात याचे अधिक जोरदार प्रत्यंतर येईल यात शंका नाही. महाविकास आघाडीला कोणीही रोखू शकणार नाही.

विचार

# अर्थव्यवस्थेसाठी स्वागतार्ह गुंतवणूक टप्पा

**आज भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात मागणीचा विस्तार होत आहे. २०२३-२४ मध्ये निफ्टी फिफ्टीमध्ये २९ टक्के, निफ्टी स्मॉल कॅपमध्ये शंभर टक्के आणि निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांकात ७० टक्के वाढ झाली. देशाचा विकास होण्याच्या दृष्टीने शेअर बाजारात तेजी असणे, तेथे नवनवीन कंपन्या भागविक्रीसाठी येणे आणि भागविक्री झाल्यानंतर त्यांचे बाजारातील भाव वधारणे, हे गुंतवणुकीसाठी स्वागतार्ह म्हटले पाहिजे.**



**महेश जोशी**

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने प्रथमच ७५ हजार अंशांचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला होता. नंतर दोन दिवस बाजारात पडझड झाली, तरी ते करेक्शन आहे. निवडणूक निकालापर्यंत बाजारात असे चढउतार सुरूच राहतील. अवघ्या चार महिन्यांच्या कालावधीत सेन्सेक्सने ७० हजारावरुन विक्रमी ७५ हजार अंशांची पातळी गाठली. गेल्या नऊ महिन्यांच्या कालावधीमध्ये सेन्सेक्सने दहा हजार अंशांची कमाई केली. मार्च तिमाहीतील कंपन्यांची मजबूत आर्थिक कामगिरी आणि निवडणूकपूर्व तेजीमुळे बाजाराचा वेग असाच कायम राहण्याची शक्यता बाजार विश्लेषकांनी व्यक्त केली आहे. दुसरीकडे, मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांचे बाजारभांडवल चारशे लाख कोटी रुपयांच्या विक्रमी टप्प्यावर पोहोचले. विशेष म्हणजे हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या १.३३ पट आकाराच्या समतुल्य आहे. मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजारभांडवलात अवघ्या नऊ महिन्यांच्या कालावधीत १०० लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. मुंबई शेअर बाजारातील कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल सप्टेंबर २००७ मध्ये पहिल्यांदा ५० लाख कोटी रुपयांवर पोहोचले. त्यानंतर मार्च २०१४ मध्ये प्रथमच १०० लाख कोटी रुपयांचा टप्पा गाठला. त्यानंतर २०० लाख कोटी रुपयांचा टप्पा गाठण्यासाठी ७ वर्षे लागली. फेब्रुवारी २०२१ मध्ये तो टप्पा गाठला गेला. जुलै २०२३ मध्ये बाजार भांडवल ३०० लाख कोटी होते, तेथून पुढे अवघ्या नऊ महिन्यांमध्ये ते ४०० लाख कोटी रुपयांवर पोहोचले. या नऊ महिन्यांच्या कालावधीत सेन्सेक्स १५ टक्के वधारला. तर व्यापक बाजाराचे प्रतिनिधित्व करणारे मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक प्रत्येकी ४० टक्क्यांनी वधारले.

गेल्या महिन्यात रिझर्व्ह बँक आणि सेबी यासारख्या नियामक संस्थांनी मिडकॅप आणि स्मॉलकॅप कंपन्यांच्या समभागांमधील वाढलेल्या मूल्यांकनाबाबत चिंता व्यक्त केली; मात्र हा सौम्य धक्का पचवल्यानंतर त्यांनी गेल्या आठवड्यात जोरदार पुनरावृत्ती केली. गेल्या नऊ महिन्यांच्या कालावधीत गृहनिर्माण क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्रातील बँक, वाहननिर्मिती, ऊर्जा आणि औषध निमिर्ती या क्षेत्रातील कंपन्यांचे समभाग सर्वाधिक वधारले. भांडवली बाजाराला उच्चांकी पातळीवर पोहोचवण्यास सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचे मोठे योगदान राहिले आहे. कैक वर्षांपासून अडगळीत लोटल्या गेलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांवर अचानक प्रकाशझोत आला. 'सेन्सेक्स'च्या ६० हजारांवरून ७५ हजारांपर्यंतच्या प्रवासादरम्यान सार्वजनिक क्षेत्रातील सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलात तब्बल दुपटीने झालेल्या वाढीची प्रमुख भूमिका राहिली आहे. सरकारी धोरणे आणि 'मोदी की गॅरंटी' यांच्याशी संबंधित गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांशी संबंधित पीएसयू निर्देशांक आणि पीएसयू बँक निर्देशांक एका वर्षात जवळपास दुप्पट झाले आहेत. जागतिक पातळीवरील आव्हानात्मक वातावरणातही देशाची अर्थव्यवस्था वेगाने मार्गक्रमण करत आहे. या आशावादाने प्रेरित होऊन परदेशी गुंतवणूकदारांनी २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये देशांतर्गत भांडवली बाजारामध्ये दोन लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे.

डिपॉझिटरीजने दिलेल्या माहितीनुसार, जून आणि जुलै २०२३ या दोन महिन्यांच्या कालावधीत परदेशी गुंतवणूकदारांनी अनुक्रमे ४७,१४८ कोटी आणि ४६,६१८ कोटी रुपयांची गुंतवणूक केली तर ऑगस्ट २०२३ मध्ये १२,२६२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. पुढे सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२३ या दोन महिन्यांमध्ये मात्र परदेशी गुंतवणूकदारांनी अनुक्रमे १४,७६८ कोटी आणि २४,५५८ कोटी रुपयांचा निधी काढून घेतला. त्यानंतर डिसेंबर महिन्यात पुन्हा त्यांनी ६६,१०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. जानेवारी २०२४ मध्ये २५,७४४ कोटी रुपयांचे निर्गमन झाल्यानंतर फेब्रुवारी २०२४ पासून परदेशी गुंतवणूकदार पुन्हा सरसावले आहेत. अर्थव्यवस्थेशी संबंधित निर्देशक, वाढती देशांतर्गत गुंतवणूक आणि राजकीय स्थिरतेच्या पार्श्वभूमीमुळे परदेशी गुंतवणूकदारांचा देशांतर्गत भांडवली बाजारावरील विश्वास वाढला आहे. अमेरिकेतील महागाईदराची आकडेवारी लवकरच जाहीर होणार असून, त्यावर अमेरिकी मध्यवर्ती बँक, म्हणजेच फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीबाबत निर्णय घेतला जाणे अपेक्षित आहे. अमेरिकेतील रोजगाराची अपेक्षित आकडेवारी, उत्पादन क्षेत्राची कामगिरी ही व्याजदरात संभाव्य बदलाला अनुकूलता दर्शवणारी आहे. अशी अपेक्षा असल्यामुळेच देशांतर्गत शेअर बाजारांमध्ये निर्देशांकाने गगनाला गवसणी घातली. शेअर बाजारात नशीब अजमावणाऱ्यांची संख्या विलक्षण वेगाने वाढत असून अलीकडच्या काही महिन्यांमधील बाजार तेजीने लक्षणीय प्रमाणात किरकोळ गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे. मार्च २०२३ ते एप्रिल २०२४ दरम्यान देशात ३.७ कोटी डिमॅट खात्यांची भर पडली आहे. ही आत्तापर्यंतची एका वर्षातील सर्वात मोठी वाढ आहे. दर महिन्याला सरासरी ३० लाख नवीन डिमॅट खाती उघडली गेली आहेत. गुंतवणुकीची प्रक्रिया कागदविरहित हाताळली जाण्यासह समभाग आणि रोख्यांच्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील जतनासाठी डिमॅट खाती उपयुक्त आहेत. यातही आणखी एक चांगली बातमी म्हणजे २०२३-२४ या आर्थिक वर्षात प्रारंभिक भाग विक्री, म्हणजेच आयपीओंमधून देशात ६२ हजार कोटी रुपयांची भांडवल उभारणी झाली. २०२४-२५ या वर्षात वेगवेगळ्या कंपन्या मिळून एक लाख कोटी रुपये आयपीओंमधून जमवतील, अशी शक्यता आहे. देशातील आर्थिक विकासदर सात टक्के असून उद्योगधंद्यांना भाग विक्रीतून दर वर्षी अडीच लाख कोटी रुपये जमवणे आवश्यक असते. कर्ज उभारणीपेक्षा शेअर बाजारातून निधी जमवणे अधिक स्वस्त पडते. एकूण ५६ कंपन्यांनी एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे (सेबी) ७० हजार कोटी रुपये भांडवल उभारणीसाठी कागदपत्रे सादर केली आहेत. या खेरीज १९ कंपन्यांनी २५ हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर करून घेतले आहेत. तर ३७ कंपन्या ४५ हजार कोटी रुपयांची समभाग विक्रीस काढणार आहेत. परंतु त्यांना अद्याप मंजुरी मिळायची आहे.

यात विशेषत्वाने सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे लगतच्या काळात येऊ घातलेले ५६ पैकी नऊ आयपीओ हे टेक कंपन्यांचे आहेत. देशातील टेक कंपन्या अधिकाधिक भांडवलसधन होणे, हे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगले असते. मागच्या वर्षीपेक्षा चालू वर्षात १९ टक्के अधिक भांडवल उभारणी होईल, असे दिसते. बाजारात आलेल्या आयपीओंपैकी ७० टक्के किंवा ५० कंपन्यांचे शेअर्स हे 'इश्यू प्राइस'पेक्षा किंवा विक्री किमतीपेक्षा अधिक किमतीला बाजारात विकले जात आहेत. म्हणजेच त्यांचे व्यवहार मूळ किमतीपेक्षा जास्त भावाने केले जात आहेत. भारतीय उद्योजकता मोठ्या प्रमाणात चैतन्यशील होत आहे. परदेशी गुंतवणुकीला सरकारचे पूर्ण समर्थन प्राप्त आहे. 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'वर भर दिला जात असल्यामुळे मंजुऱ्या पटापट मिळत आहेत. देशातील आर्थिक साक्षरता वर्धिष्णू आहे आणि संस्थात्मक गुंतवणूकदार आयपीओंना पाठिंबा देत आहेत. खासगी भांडवलाला जोम प्राप्त होणे, प्रचंड प्रमाणात रोजगारनिर्मिती होणे, सरकारी अनुदानातील गळती थांबणे, न्यायालयीन सुधारणा आणि पायाभूत सुविधांचा विस्तार हे सर्व घडून आल्यास शेअर बाजाराला फायदाच होईल.

आज भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात मागणीचा विस्तार होत आहे. २०२३-२४ या वर्षात निफ्टी फिफ्टीमध्ये २९ टक्के, निफ्टी स्मॉल कॅपमध्ये शंभर टक्के आणि निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांकात ७० टक्के वाढ झाली. म्युच्युअल फंडांनी एक लाख ९० हजार कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले तर परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी दोन लाख कोटी रुपयांचे शेअर्स विकत घेतले. नव्याने सूचीबद्ध होत असलेल्या समभागांची कामगिरी कशी आहे, हे पाहण्यासाठी एसअँडपी, बीएससी आयपीओ निर्देशांक महत्त्वाचा असतो. या निर्देशांकात २०२३-२४ मध्ये ६९ टक्के एवढी घसघशीत वाढ झाली. स्मॉल आणि मिडकॅप मधल्या कंपन्यांच्या तेजीमुळे नव्याने सूचीबद्ध झालेल्या कंपन्यांच्या शेअर्सचे भावही वाढले. फर्स्ट पब्लिक ऑफर (एफपीओ)मध्ये किरकोळ गुंतवणूकदारांनी शेअर खरेदीसाठी केलेल्या अर्जांमध्येही सहा लाखांवरून १३ लाख इतकी वाढ झाली आहे. कंपनी सूचीबद्ध झाल्यानंतर तिच्या भावांमध्ये मागच्या वर्षात सुमारे नऊ टक्के तर २०२३-२४ मध्ये २९ टक्के इतकी वाढ झाली. सामान्य माणसाला आयपीओमधून या प्रकारे फायदा होणार असेल, तर तो मोठ्या प्रमाणात कंपन्यांच्या नवीन शेअरशी किंवा प्रारंभिक शेअरची खरेदी करणार, यात शंका नाही. देशाचा विकास होण्याच्या दृष्टीने शेअर बाजारात तेजी असणे, तेथे नवनवीन कंपन्या भागविक्रीसाठी येणे आणि भागविक्री झाल्यानंतर त्यांचे बाजारातील भाव वधारणे, हे गुंतवणुकीसाठी अत्यंत पोषक व स्वागतार्ह आहे, असेच म्हटले पाहिजे.

आजकाल

# हीच वेळ आहे पुनर्रेखाटनाची

**संजीव चांदोरकर**

काही आठवड्यापूर्वी गौरव वल्लभ या काँग्रेसच्या प्रवक्त्यांनी काँग्रेस सोडताना सांगितले कि देशातील संपत्ती निर्माणकर्त्यांवर (वेल्थ क्रियेटर्स) काँग्रेसवाले टीका करू लागले आहेत आणि ते मी सहन करू शकत नाही; कोणत्या वेल्थ क्रियेटरची सुपारी घेऊन बोलत होते ते भविष्यात कळेल. आता पुढे आले आहेत मुरली देवरा यांचे राजकीय वारस मिलिंद देवरा; असे म्हणत आता "काँग्रेस समाजवादी आणि कम्युनिस्ट आर्थिक धोरणांची भाषा करू लागली आहे" असे ते एका मुलाखतीत म्हणतात (बिझिनेस लाईन १८ एप्रिल पान क्रमांक ४) देवरा कुटुंब कोणत्या उद्योगसमूहांचे हितसंबंध सांभाळण्यासाठी संसदीय राजकारणात होते याची माहिती असणाऱ्यांना मिलिंदजीनी हे बोलायला इतके दिवस का घेतले याचे आश्चर्य वाटेल.

गौरव वल्लभ आणि मिलिंद देवरा यांचा सारा राग राहुल गांधींवर आहे हे उघड आहे. राहुल गांधीं सातत्याने अदानी यांच्या मोदी राजवटीशी असणाऱ्या क्रोनी संबंधावर सार्वजनिक व्यासपीठांवर टीका करत आहेत ; नावे घेऊन बोलत आहेत. राहुल गांधी फक्त अदानी बद्दल बोलत नाहीत, व्यवस्थेबद्दल / सिस्टीमबद्दल बोलत आहेत.

वायनाड येथील एका सभेत त्यांनी सत्तेवर आल्यावर आम्ही जातीनिहाय गणना (कास्ट सेन्सस) करूच त्याचप्रमाणे देशातील श्रीमंतांचा देखील सर्व्हे करणार असल्याचे जाहीर केले आहे; व्यक्तींची नावे घेतली तर लोक एकवेळ माफ करतात, पण आम्ही सिस्टिमला हात घालू म्हटले कि त्यांचे धाबे दणाणते; ते बिथरतात.

वेल्थ क्रियेटर/संपत्ती निर्माणकर्ते हा टिपिकल स्टॉक मार्केट परिभाषेतला शब्द आहे. स्टॉक मार्केटला सामाजिक / राजकीय समर्थन मिळवून देणे यासाठी तो कॉईन केला आहे. मुंबई स्टॉक मार्केटचे मार्केट कॅपिटलायझेशन ४ ट्रिलयन डॉलर्स झाले ; मागच्या वर्षी अमुक एका कंपनीने एवढी वेल्थ क्रिएट केली या बातम्या सातत्याने आणल्या जातात. हे चालू लोक संपत्ती नक्की कशी क्रिएट होते ? यावर बोलत नाहीत. "अ" नावाच्या काही मूठभर व्यक्ती जर संपत्ती निर्माण करू शकत असतील तर त्यांना सार्वजनिक पैशातून अंतराळात पाठवा. मग अंतराळात ते संपत्ती निर्माण करतील आणि आपल्या देशाकडे ट्रान्सफर करतील.

शेअरची किंमत वाढून जर संपत्ती वाढते तर शेअर पडल्यानंतर वेल्थ नष्ट होत असेल तर त्या संपत्तीला काय चाटायचे?

संपत्ती निर्माण आणि संपत्ती निर्माणाचे मार्ग याचा काही परस्पर संबंध असतो कि नाही, त्यावर यांचे काहीच म्हणणे नाही?

उदा. क्रोनिझम, स्वस्तात जमिनी/पाणी/सार्वजनिक उपक्रम गिळणे/मानवी श्रमाला कमी मोबदला देणे याबद्दल त्यांची काही मते आहेत का? मध्यन्तरीच्या काळात सबगोलंकारी झालेली काँग्रेस आता ठोस भूमिका घेऊ लागली आहे त्याचे स्वागत!

स्वातंत्र्य आंदोलनानंतर अनेक वर्षे असेलेली आपली "लेफ्ट ऑफ सेंटर" ओळख काँग्रेस पुन्हा घेऊ लागली असेल तर त्याचे स्वागत सुरुवात परिभाषेतूनच होणार; लोकांच्या मनाची पकड घेणारी मांडणी, घोषणा, परिभाषा त्यांना कळेल अशा भाषेच करायचे खूप मोठे आव्हान आहे.

उदा मूठभरांच्या संपत्ती पेक्षा सामूहिक सुबत्ता कलेक्टिव्ह प्रॉस्परिटी अशी मांडणी केली पाहिजे. गेल्या ४० वर्षाचा पुस्तकी नवउदारमतवादी प्रकल्प/जागतिकीकरण आचके देत आहे.

डब्ल्यूटीओ मेली आहे. पण त्या पोपटासारखे कोणी डिक्लेयर करणार नाहीये ती मेली. वित्त भांडवलाचे अराजकवादी भूत सर्व जगात संचार करत आहे ; त्याच्यात जन्मतः सुसायडल टेंडन्सी आहेत. जिओ पॉलिटिक्स वेगाने बदलत आहे. हि नुसती सुरुवात आहे.

पर्यावरण आपला पणजोबा/खापर पणजोबा, आता जागेवर बसून आपल्याला इशारे देत आहे. कि बाळांनो, दंगामस्ती कमी करा. तो समजा जागेवरून उठला तर आपल्याला खरच समुद्रात नाहीतर अंतराळात भिरकावून देईल.

हीच वेळ आहे पुनर्रेखाटनाची ! सर्वार्थाने भारताच्या सामाजिक, डेमोग्राफिक, नैसर्गिक, साधनसामुग्री गुणवैशिष्ट्ये लक्षात घेऊन भविष्य ठरवले पाहिजे.

त्यासाठी पुस्तकांशिवाय ओरिजनल आयडियाजची गरज आहे. समाजवाद वि भांडवलशाही; डावे वि उजवे या विसाव्या शतकातील बायनरीत अडकू नका तरुण मित्रानो.

अगदी अमेरिकेसकट सर्व देश आपल्या देशाला काय चांगले/वाईट अशी आर्थिक धोरणे आखू लागले आहेत

राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने आपली मुळांना मोकळे करून, आपला वारसा रिक्लेम केला पाहिजे; जे सोडून जात आहेत त्यांना धन्यवाद द्या; त्यातून शुद्धीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळत आहे

लेफ्ट ऑफ सेंटर काँग्रेसची सर्व देश वाट बघत आहे.

लोकसंसद

## मुलांचे सुट्टीत हस्ताक्षर सुधारावे

आजकाल मोबाईल व लॅपटॉपच्या दुनियेत मुलांच्या हस्ताक्षराकडे कोणाचेच लक्ष नाही. सुमारे तीस चाळीस वर्षांपूवी मुलांना शाळेत बोरू व वहीवर हस्ताक्षराचे धडे जिरवावे लागत. त्यासाठी शिक्षक मेहनत करीत असत. शाळेत हस्ताक्षर स्पर्धा असे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर चांगले असे. चांगल्या हस्ताक्षरामुळे पेपर तपासताना परीक्षकांना सोयीचे जाते व त्याला अधिक गुण सुद्धा मिळू शकतात. आता मुलांना उन्हाळ्याच्या सुट्या लागल्या आहेत. या सुट्टीत पालकांनी मुलांचे हस्ताक्षर सुधारण्याचा प्रयत्न करावा. मुलांना अक्षर घडविण्याचे प्रॅक्टिस सुलेखन वहीच्या साहाय्याने करावे असे केल्यास सुट्टीत मुलांचे हस्ताक्षर सुधारण्यास मदत होईल. याशिवाय त्यांना हस्ताक्षराचे महत्व सुद्धा पटेल व भविष्यात ते अधिक चांगले लक्ष देऊ शकतील चांगले हस्ताक्षर हा एक दागिना आहे असे म्हटले जाते. त्याची जपणूक करणे हे विद्यार्थ्यांच्या बरोबर पालकांची सुद्धा जबाबदारी आहे लेखक व.पु.काळे, ग.दि.माडगूळकर यांची अक्षरे डौलदार असत व त्यामुळे पाहणाऱ्यांचे त्याकडे लक्ष जात असे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**वीस एप्रिल**

**१८९०:-** संत साहित्याचे गाढे अभ्यासक आणि लेखक गणेश गोविंद कारखानीस यांचा जन्म. गुरुदेव रानड्यांचा सहवास त्यांना लाभला. त्यांच्या प्रभावामुळे गुरुदेव रानडयांच्या संप्रदायाची दीक्षा त्यांनी घेतली. कारखानीस यांनी 'संत ज्ञानेश्वर', 'संत तुकाराम' 'समर्थ रामदास स्वामी' यांच्या ग्रंथाचे वाचन चिंतन केले होते. कर्नाटकात त्यांना ज्ञानेश्वरीच्या काही हस्तलिखित प्रती मिळाल्याने ते ज्ञानेश्वरीच्या पाठ्यचिकित्सक वळले. संत साहित्यावर ते रसाळ वाणीने प्रवचन करत. या विषयावरचे त्यांचे मार्मिक अभ्यासपूर्ण लेख रामदास-रामदासी मासिकातून प्रसिध्द झाले. या लेखांना पुढे 'संत आणि समाज' व 'श्री समर्थ रामदास' या दोन खंडात संग्रहित झाले. कानडी भाषेवरही त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचे लेखन सामान्यांना उद्बोधक करणारे असून संशोधकांना ते उपयुक्त आहे. **१८९६:-** शंकर वामन दांडेकर (सोनोपंत दांडेकर) यांचा जन्म. ते संतसाहित्य व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक. वारकरी संप्रदायाचे इतिहासकार, ज्ञानेश्वरी तसेच नामदेव गाथेची उत्कृष्ठ संपादने (सरकारी प्रत) करण्याखेरीज 'ज्ञानदेव व प्लेटो', 'अध्यात्मशास्त्राची मूलतत्वे', 'ईश्वरवाद' यासारख्या ग्रंथांतून आजची तत्त्वचर्चा घडवून आणणारे लेखक 'प्रसाद' मासिकाचे संपादक. पुण्याच्या स.प. महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रवचनकार अशा विविध भूमिका निभावणाऱ्या सोनोपंताबल वारकऱ्यांना विशेष ममत्व वाटे. **१९२२:-** लेखक सदाशिव बळवंत लोटलीकर यांचे निधन. ख्रिस्ती झालेल्या लोटलीकरांनी सनातन आंग्ल संप्रदायी मिशन-ने प्रसिध्द केलेल्या अनेक पुस्तकांचे संपादन केले. **१९३१:-** लेखक, कवी गोविंद रामचंद्र हिंगणेकर यांचे निधन. त्यांनी अफझलखानाच्या वधावर 'दख्खनचा वीर आणि बाजीप्रभूच्या बलिदानावर 'पावनखिंड' ही ऐतिहासिक खंडकाव्य तसेच 'काव्यकुंज' हा स्फूट कवितांचा संग्रह आणि 'गमावलेले स्वराज्य' व 'मिळवावयचे स्वराज्य' ह्या दीर्घ कविता अशी साहित्यसंपदा. **१९३२:-** साहित्यिक वसंत दत्तात्रय जोशी यांचा जन्म. लेखनाची सुरुवात ललित निबंध आणि कथेने करणाऱ्या वसंतरावांच्या नावावर २५ पुस्तके असून त्यात एकांकिका, कादंबरी, 'बिन बियांच्या गोष्टी' हा कथासंग्रह इत्यादी समावेश. **१९३२:-** नामवंत मराठी नियतकालिकांतून चार दशकाहून अधिक काळ कथालेखन करणारे साहित्यिक गो. य. सावजी यांचा जन्म. 'चोदवा', 'जंगली कायदे' हे बालकथासंग्रह. 'बागेत हरवली कळी' ही किशोरकादंबरी, 'कलमी आंबे' या विनोदी कथासंग्रहासह 'अनाथ', 'रुपवती' मिळून पाच कथासंग्रह, 'मनमोर' या लेखसंग्रहासह तीन कादंबऱ्या त्यांच्या प्रसिध्द झाल्या आहेत. **१९३५:-** मराठी, हिंदी वर्तमानपत्रातून सातत्याने लेखन करणारे बाबूराव विठ्ठल चंदावार यांचा जन्म. 'स्वातंत्र्य आणि लोकशाही' हा वैचारिक विश्लेषणात्मक निबंध संग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९५४:-** लेखक झाडे श्याम उपारण्य शामराव किसन यांचा जन्म. यांचा 'शिवार' हा कथासंग्रह. 'बळीराम' ही कांदबरी, 'शिरवा' हा काव्यसंग्रह आणि 'मनगट' हे वैचारिक पुस्तक प्रसिध्द झाले आहे. **१९६४:-** लेखिका सुनेत्रा संजय टिकेकर यांचा जन्म. यांचा 'आस्था' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९६५:-** इतिहासकार, वृत्तपत्रसंपादक हरिहर वामन देशपांडे यांचे निधन. 'राजपूत संस्कृती', 'राजपूत राज्याचा उदय व ऱ्हास', 'सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचे स्वरुप', 'यावलीचा स्वातंत्र्यसंग्राम १९४२' या ऐतिहासिक ग्रंथाबरोबर 'पोरुष प्रदिप' अर्थात महात्मा गांधी यांच्या ब्रम्हचर्यावरील लेख या ग्रंथाचे संपादन अशी साहित्य संपदा. **१९६५:-** कवी, कथालेखिका सुमती वानखेडे यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'मनोमनी', 'बंद ओठ माझे', 'श्रावण भुलाव्याचे' हे काव्यसंग्रह. 'उन्हाळसावली', 'जाणता अजाणता' हे कथासंग्रह आणि 'हे वर्तुळ असेच असते' हा ललित कथासंग्रह प्रसिध्द. **१९९९:-** 'रुचिरा' या पाककृतीविषयक पुस्तकामुळे तमाम 'नव्या सुनांची आई' ठरलेल्या कमलाबाई ओगले यांचे निधन. १९७० सालचे हे पुस्तक या विषयावरील सर्वाधिक खपाचे ठरले होते.




**२००८:-** लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासक सरोजिनी बाबर यांचे निधन. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे त्यांनी लोकसाहित्याच्या ३० खंडांचे संपादन केले. लोकघाटी, ग्रामजीवन, आदिवासी जीवन आणि स्त्रीजीवन या साऱ्यांचे प्रेमळ कुतूहल जपणाऱ्या सरोजिनीबाईंनी दोन कादंबऱ्या आणि काही कथासंग्रहदेखील लिहिले तसेच अनेक ललित लेखांतून शहरी समाजाला महाराष्ट्राच्या मुळांचे भान दिले. **२०१४:-** संस्कृत, इंग्रजी आणि मराठी साहित्याचे जाणकार अभ्यासक प्रा. प्रभाकर शंकर तासे यांचे निधन. वृत्तपत्रासाठी स्वतंत्रपणे लेखन करणाऱ्या प्रा. तासे यांचा 'सीमांतिनी' हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला आहे.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## पान १ वरुन

### रायगडात उमेदवारांची मांदियाळी

ज्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत आहे, ती व्यकती कोणत्याही घटकराज्यात लोकसभेचा उमेदवार म्हणून उभा राहू शकतो. लोकसभेच्या निवडणूक रिंगणात उतरल्याची नोंद होत असल्याने अनेकजण उमेदवार बनण्यास इच्छुक असतात. पक्षाकडून उमेदवारी असेल तरच नामनिर्देशन दाखल करताना मान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून एबी फॉर्म आवश्यक असतो. मात्र, अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी एबी फॉर्मची आवश्यकता नसते.

### पाकीटमारी थांबवण्याची गरज

असल्याचे सांगतात. मात्र, त्यांचेच मंत्री घटना बदलणार असल्याचे सांगतात. घटना बदलण्याचा विचार गंभीर आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला अधिकार महत्वपुर्ण आहे. त्यासाठी सर्वांनी जागरुक राहण्याची गरज पवार यांनी व्यक्त केली.'लोकशाहीमध्ये निर्णय घ्यायचा अधिकार तुमचा आहे आणि हा अधिकार टिकला पाहिजे, या देशाची घटना मोदीसाहेबांना बदलायची आहे असं एक मंत्री म्हणाले ते ही मोदी सरकारमधील आहेत. घटना बदलण्याचा निर्णय कोणी घेत असेल तर गंभीर आहे,' असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला आहे.

### अधिकारी रमले निवडणुकीत

अनधिकृत कामांचे पेव वाढले आहेत. अधिकारीवर्गाला निवडणुकीच्या कामातून बाहेर पडायला वेळ नाही आणि असे असताना कर्जत तालुक्यात असंख्य अनधिकृत कामे सुरू आहेत. त्यात वाळू काढण्याचे लिलाव शासनाने काढले नाहीत आणि तरीदेखील अनधिकृतपणे वाळूउपसा जेसीबी आणि पोकलेन मशीन यांचा वापर तालुक्यातील सर्व नद्यांमध्ये रात्रंदिवस सुरू आहे. वाळू नदीमधून काढून ती जागोजागी साठवून ठेवली जात असतानादेखील एरवी सतर्क असलेले तलाठी आणि मंडळ अधिकारी असे महसूल खात्याचे कर्मचारी निवडणूक कामात असल्याची उत्तरे मिळत आहेत. त्यामुळे तालुक्यातील नद्या पोखरल्या जात असून, अनधिकृतपणे वाळू काढली जात असताना महसूल प्रशासन कोणतीही कारवाई करीत नसल्याने महसूल खात्याच्या आशीर्वादाने हे सुरू आहे काय, असा संशय व्यक्त केला जात आहे.

कर्जत तालुका मोठ्या प्रमाणात जंगल असलेला तालुका म्हणून ओळखला जायचा. मात्र सध्या निवडणूक काळात आपल्याला कोणी अडवायला येणार नाही, अशा तोऱ्यात जंगलतोड रात्रंदिवस सुरू आहे. तालुक्यात कर्जतपासून खांडस आणि झुगरे वाडीपासून बीड आणि बेडिसगावपासून कर्जत अशा प्रत्येक भागात जंगलतोड सुरू असून, राखीव जंगलदेखील तोडले जात आहे. त्यात कर्जत तालुक्यात सर्वात जास्त जंगलतोड कशेळे परिसरात कळंबपासून आंबिवली भागात सुरू आहे. त्या भागात स्थानिक शेतकरी यांच्याकडूनदेखील जंगलतोड करण्याची परवानगी घेऊन जंगले तोडली जात आहेत. मात्र, त्यावेळी जंगल तोडणारे ठेकेदार हे मोजून दिलेल्या जागेपेक्षा अधिक प्रमाणात जंगलाची तोड करताना दिसत असून, वन विभाग त्याकडे डोळेझाक करीत आहे. वन विभाग यांच्याकडून जंगलातील झाडे देण्याची परवाना दिला गेला आहे, पण ते परवाने देताना संबंधित ठेकेदार यांच्याकडून परवानापेक्षा अधिक झाडांची कत्तल सुरू असून, कर्जत तालुक्यात आगामी काळात जंगल शोधावे लागण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे.

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून, कर्जत तालुक्याच्या प्रत्येक भागात जमीन विकण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे जमीन खरेदी करणारे यांच्याकडून विकत घेतलेल्या जमिनीवर खड्डे भरण्यासाठी असलेले डोंगर फोडण्यासाठी सपाटीकरण केले जात आहे. हे सपाटीकरण कर्जत तालुक्यातील मातीचे डोंगर उद्ध्वस्त करीत असून, कर्जत तालुका सिमेंट जंगलात परावर्तीत होण्यास अवधी लागणार नाही अशा प्रकारे तालुक्यात शासनाच्या आशीर्वादाने जमिनीचे सपाटीकरण केले जात आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत आणखी एक प्रकरण कर्जत तालुक्यात सुरू असून, जमीन सपाटीकरण करताना काढलेली लाल मातीदेखील विकली जात आहे. लाल माती विकण्याचा व्यवसाय कशेळे परिसरात जोरात सुरू आहे. त्यासाठी शासनाने तात्काळ जमीन सपाटीकरण सुरू आहे, तेथे तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते उदय पाटील यांनी केली आहे.

**जमिनीचे सपाटीकरण करताना तेथील लहान-मोठी झाडे तोडण्यात येत आहेत. थोडीशी रॉयल्टी भरायची आणि त्याच्या दहा पट जमिनीचे उत्खनन करायचे असे प्रकार सुरू असून, झाडे मुळासकट नष्ट होत असून, असे सर्व प्रकार रोखण्याची गरज आहे. आम्ही अनेक अधिकाऱ्यांना सांगण्याचा प्रयत्न केला असता साहेब निवडणूक कामावर अशी उत्तरे दिली जात आहेत.**

**- उदय पाटील, सामाजिक कार्यकर्ते**

### रोपवेला आणखी एक ट्रॉली

परंतु अजून एक नवीन ट्रॉली वाढल्याने गडावर जाणाऱ्या पर्यटकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. सध्या प्रायोगिक तत्त्वावर चार ट्रॉल्या चालू केल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक ट्रॉलीत चार माणसे बसविली जातील आणि येणाऱ्या २३ तारखेला शिवपुण्यतिथी दिनी नवीन ट्रॉलीचा लोकार्पण सोहळा करून त्यानंतर रितसर चार ट्रॉल्या सुरू करण्यात येणार असल्याची माहिती रायगड रोपवे प्रशासनाच्या वतीने रोपवेचे व्यवस्थापक राजेंद्र खातू यांनी दैनिक कृषीवलशी बोलताना सांगितले. गडावर जाण्यासाठी प्रत्येक व्यक्तीसाठी ३१० रुपये रिटर्न तिकीट असणार आहे, तर सिंगल तिकीट २०० रुपये असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी २०० रुपये तिकीट ठेवले आहे. लहान मुलांसाठी उंचीप्रमाणे तीन फुटाच्या खाली जी मुले असतील, त्यांच्यासाठी फ्री तिकीट तर तीन व चार फुटांमध्ये सवलत तिकीट दोनशे रुपये असणार आहे, तसेच चार फुटांच्या वर फुल तिकीट असणार आहे. अपंग व्यक्तीसाठी रायगड रोपेकडून फ्री सवलत ठेवली आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी पहिली ते सातवीपर्यंत १९० रुपये रिटर्न ठेवले आहे. यामध्ये सिंगल १३० रुपये आठवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी २२५ रुपये रिटर्न व सिंगल १९० रुपये तिकीट दर असल्याचे रोपवे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

दरम्यान, याआधी किल्ले रायगडवर जाण्यासाठी तीन तसेच खाली येण्यासाठी तीन ट्रॉली अशा होत्या; परंतु आता एक नवीन ट्रॉली बसवण्यात आले असल्याचे किल्ले रायगडावर जाणाऱ्या येणाऱ्या पर्यटकांचा खोळंबा होणार नाही, शिवाय वेळेचेही बचत होणार आहे.रायगड रोपवे दिवसेंदिवस प्रगतीपथावर असल्याने गडावर येणाऱ्या शिवप्रेमींसह पर्यटकांकडून रोपवे प्रशासनाचे कौतुक होत असल्याचे बघायला मिळत आहे.

### मतदारांनी गाठली 'साठी'

यासाठी १.८७ लाख मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत.

शुक्रवारी सकाळी ७ वाजल्यापासून या मतदानाला सुरुवात झाली असून, विदर्भातील उष्णतेचा पारा लक्षात घेता सकाळच्या टप्प्यातच मतदानाचा हक्क बजावण्यास मतदारांचा कल दिसला. मात्र, प्रखर उष्णतेचा वाढता पारा लक्षात घेता, दुपारच्या सत्रात लोकांनी मतदान करणे टाळले आहे.

नागपुरात मतदान सुरू होताच पहिल्या दोन तासात १३ टक्के मतदान झाले होते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने डोळ्यापुढे ठेवलेले उपराजधानीत मतदानाचे उद्दिष्ट गाठले जाणार, असा अंदाज बांधण्यात येत होता. मात्र, गेल्या काही दिवसापासून विदर्भात उष्णतेने कहर केला आहे. त्यामुळे त्याचा फटका हा मतदानालाही बसला आहे. परिणामी, दुपारी वाढते उन लक्षात घेता मतादारांनी दुपारच्या सत्रात घरातून बाहेर पडण्यास फारशी पसंती न दिल्याचे दिसले. मात्र, संध्याकाळी ऊन उतरताना मतदाते बाहेर पडल्याचे चित्र दिसून आले.

### एसटी बसचा अपघात

रस्त्यावर एनएमएमटी बस डेपो आसुडगाव येथील रस्त्यावर आली असता पुढे जाणाऱ्या एका वाहनाला बसने पाठीमागून जोरात धडक दिली. हा अपघात एवढा जोरात होता की, बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातामुळे बसमधील अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. तर, एसटीचा चालकदेखील जखमी झाला असून, जवळपास १५ ते २० जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमी प्रवाशांना एमजीएम रुग्णालय, कामोठे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी खांदेश्वर पोलीस, कळंबोली वाहतूक पोलीस घटनास्थळी हजर झाले होते. काही वेळाने टोइंगने एसटी बस बाजूला घेण्यात आली.

### पोलिसात गुन्हा

व्यक्तीविरोधात नोंदविला आहे. अत्याचार करणाऱ्या व्यक्तीने मोठ्या पदावर काम करत असल्याचे भासवून या पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून प्रेमात अडकवले. पीडितेचा विश्वास संपादन केल्यावर सानपाडा येथील हॉटेल स्काय स्वीटमध्ये वारंवार तिच्यावर अत्याचार केल्याचे पीडितेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, अत्याचार करताना त्याने पीडितेचे चित्रण केले. पीडितेने इतर कोणाशी लग्न केल्यास संबंधित चित्रण समाजमाध्यमांवर प्रसारीत करण्याची तसेच जो कोणी पीडितेशी लग्न करेल त्यालासुद्धा पाठवण्याची धमकी दिली. त्यामुळे पीडितेचे लग्न मोडले. अखेर खारघर पोलिसांत पीडितेने संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

### प्रचाराचा नारळ फुटला; राष्ट्रवादीची पाठ

उपनगराध्यक्ष अशी कार्यकर्त्यांची फळी आहे. प्रत्येक नगरसेवकांनी व आजी-माजी नगरसेवकांनी दहा कार्यकर्ते आणले असते तरी १०० ते १५० कार्यकर्ते सहज हजर झाले असते. परंतु, तसे झाले नाही. बोटावर मोजण्याएवढेच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते हजर होते. त्यातच मा. नगराध्यक्ष संतोष श्रृगांरपुरे व मा. उपनगराध्यक्षा वसुधा पाटील यांची गैरहजेरी प्रकर्षाने जाणवत होतीच. त्यातच चर्चेचा विषयही होता. प्रचार रॅलीमध्ये पाच नगरसेवक, तीन मा. उपनगराध्यक्ष, अशी राष्ट्रवादीचे नेतेगण उपस्थित असूनही त्यांना कार्यकर्ते जमवता आले नाहीत. तर, शिंदे गटानेसुद्धा या प्रचाराकडे पाठ फिरवली होती.

### फक्त २०७ अर्ज दाखल

असताना आता ही प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. समाजातील आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण हक्क कायदा करण्यात आला आहे. त्या अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. मात्र, अंतर्गत प्रवेश प्रक्रिया गेल्या काही दिवसांपासून रखडली होती. बुधवारपासून ही प्रक्रिया सुरु झाली आहे.

पालकांना आरटीई प्रवेशासाठी अर्ज भरत असताना केवळ सरकारी व अनुदानित शाळांची यादी समोर येत आहे. त्यामुळे पालकांची घोर निराशा झाली आहे. सरकारी शाळेत प्रवेश घ्यायचा मग आरटीईचा अर्ज कशाला करायचा? अर्ज न भरतासुद्धा शाळेत थेट प्रवेश मिळतोच ना? मग एवढा खटाटोप कशासाठी? असा प्रश्न पालकांकडून उपस्थित केला जात आहे. आपल्या मुलालासुद्धा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळावी, या उद्देशाने पालक आरटीईतून प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न करत होते.


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### कामगारांना मिळाले वेतन

**पाताळगंगा :** खालापूर तालुक्यातील इंडिया बुल्स या कंपनीतील कोरोना काळातील थकित वेतन अखेर कामगारांना मिळाले असून, कामगार नेते रासप राज्य कार्यकारिणी सदस्य भगवान ढेबे यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. खालापूर तालुक्यातील इंडिया बुल्स या कंपनीतील सहा कामगारांचे वेतन कोरोना काळात कंपनीने दिले नव्हते. त्या कामगारांनी कामगार नेते भगवान ढेबे यांच्याशी संपर्क साधत थकित वेतन मिळवून देण्याची विनंती केली. याबाबत ढेबे यांनी कंपनीची तक्रार कामगार आयुक्तांकडे करून काम गारांची बाजू मांडली. कामगार आयुक्तांनी याची दखल घेत अथक प्रयत्नांनंतर कामगारांना थकित वेतन देण्याचे कंपनी व्यवस्थापनाने व ठेकेदाराने मान्य केले. कंपनीनेही या काम गारांना थकित पगाराचे धनादेश दिल्याने कामगार नेते भगवान ढेबे यांचे कामगारांनी आभार मानले. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला थकित वेतनाचा प्रश्न अखेर सुटल्याने कामगारांमध्ये समानाधाचे वातावरण असून, कंपनीने केलेल्या सहकार्याबद्दलही व्यवस्थापनाचे आभार मानण्यात आले. यावेळी कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031088**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-14/2024-2025.**<br>RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Substation Maint Sub Dn Apta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025....2nd call.<br>**Tender amount Rs. 5,99,904/- ,**<br>**EMD amount Rs. 5,999/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **22.04.2024, 18:00 Hrs. to 29.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 29.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **30.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030775**<br>**Tender No. :EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-74/2023 - 2024.**<br>RFx e-tender for work of replacement of existing 6 Nos. 220kV post insulator structure at 220kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel…**3rd call.**<br>**Tender amount Rs. 1,82,375/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **22.04.2024, 18:00 Hrs. to 29.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 29.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **30.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमच्या सांगण्यावरून **श्री. प्रदीप दत्ताराम नाईक** मु. सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे खुद्द मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील असलेली मौजे-सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड शेतजमिन मिळकतींबाबत शोध/तपास करीत आहोत. सदरची मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रदीप दत्ताराम नाईक यांच्याबरोबर आमचे अशिलांची खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याबाबतची बोलणी चालु आहे.

मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड येथील दुय्यम निबंधक, अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ. मी) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| सहाण, ता. अलिबाग | ३४८/३ | ३.०७.०० | ३०.७७ |

जर कोणालाही/कोणाचाही सदरील मिळकतीचे संदर्भात विक्री, अदलाबदल, हस्तांतरण, असाईन मेंट, देणगी, हवाला, वारसा, लायसन्स, देखभाल, बीकवेस्ट, इजमेंट, कॉव्हेनंट, गहाण, दान, बक्षिस, लीन, लिस करार, भाडेपट्टा, ताबा, वहिवाट, जप्ती, लिस पेंडन्स, एफ.एस. आय वा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, मागणी, हितसंबंध, वा दावा, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे लेखी कळवावे.

वरील मुदतीत कोणाकडुन काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजुन आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडुन दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण-अलिबाग
दिनांक -१८/०४/२०२४

सही/-
**ॲड. प्रियांका किशोर बिर्जे**
मु. पो. कूरूळ, ता. अलिबाग,
जि. रायगड, मो.नं.८३७९९३७८७०

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. :- ५५/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार
वय ६५ वर्षे, धंदा : शेती. — अर्जदार
रा. जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचयात माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार यांचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०९/१९५९ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. २०७५/२०२३-२४ ने दि. ०१/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०९/१९५९ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आप ली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नजीर अहमद इस्माईल जामदार यांचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०५/०९/१९५९ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १९-०४-२०२४

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**जाहीर नोटीस**

आमचे अशिल लाटीम ग्रुप ऑफ कंपनिजचे चेअरमन श्री. राहुल मगनलाल टिंबाडीया, रा. विलेपार्ले, मुंबई, हे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळवितात की,

आमच्या अशिलांस खात्रीशीर कळले आहे की, श्री. जितेंद्र लखमिचंद जैन, रा. बाजारपेठ, पाली, ता. सुधागड हे लाटीम ग्रुप ऑफ कंपनिजचे पार्टनर/भागिदार असल्याचे समाजात दर्शवित आहेत, वास्तविक पाहता श्री. जितेंद्र लखमिचंद जैन, हे लाटीम ग्रुप ऑफ कंपनिजचे कोणत्याही प्रकारे पार्टनर/भागिदार नाहीत अथवा त्यांचा लाटीम ग्रुप ऑफ कंपनिजशी दुरान्वये संबंध नाही.

सबब सदर जाहिर नोटीशींचे प्रसिध्दी नंतर कोणीही परस्पर लाटीम ग्रुप ऑफ कंपनिजचे पार्टनर/भागिदार म्हणुन श्री. जितेंद्र लखमिचंद जैन, यांचेशी मिळकतींचा खरेदी विक्री व्यवहार अथवा अन्य व्यवहार केलेस सदर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २०/०४/२०२४

सही /-
**ॲड. नोएल सॅमसन चिंचोलकर**
मु.पो. पाली. एकतापथ,
ता. सुधागड, जि. रायगड,
४१०२०५ मो. नं. ९२७१९२३९०३

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**



२० एप्रिल
१) श्री. वासुदेव रामा म्हात्रे
ठिकरुळ नाका, अलिबाग २०-०४-१९३५
२) श्री. मोहन गणेश शेंड्ये, अलिबाग २०-०४-१९५२

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वाघोलीवाडी, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक हरिश्चंद्र जनार्दन वालेकर, चंद्रभागा जनार्दन वालेकर, उदय जनार्दन वालेकर, वर्षा रविंद्र घोसाळकर, सुजाता लक्ष्मण दांडेकर सर्व रा. मु, कामार्ले, पो. वाघोली, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली वरकस मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वाघोलीवाडी ता. अलिबाग जि. रायगड | ६९/२ | ०-१५-००<br>पो.ख. ०-०६-००<br>एकुण क्षेत्र ०-२१-०० | ०.३० |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २०/०४/२०२४

सही /-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग,
जि. रायगड मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे आशिलांनी बखरा मनोज बुबर यांची गाव मौजे गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत त्याचे समोर नमुद मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील अधिकार अभिलेखात खालीलप्रमाणे नमूद असणारी शेती मिळकत**

| भोगवटादार | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| बखरा मनोज बुबर | ४ | २२/ब | ०-२४-७०<br>पो.खं. ०-०७-३०<br>एकूण ०-३२-०० | ०.२४ |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, कुळ, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, अतिक्रमण वगैर प्रकारचा हक्क हितसंबंध अगर बोजा असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांच्याकडे आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली नमूद पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत. असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून उपस्थित होणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
कळावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक १९/०४/२०२४

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
पत्ता कोर्ट व्हिव बिल्डींग, सदनिका कं. १०१
कर्जत दिवाणी न्यायालयासमोर कर्जत
रायगड मो.नं. ९६०४५४५७७७

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. :-५४/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. अहमद शेख दाऊद परदेशी
वय: ७१ वर्षे, धंदा : शेती.
रा. ४८५, जुने माणगांव, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अहमद शेख दाऊद परदेशी यांचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०४/१९५३ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०१/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे जुने माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०४/०४/१९५३ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही पुराव्यासह प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अहमद शेख दाऊद परदेशी यांचा जन्म मौजे जुने माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०४/०४/१९५३ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १९-०४-२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगाव**

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशील श्री. अहसान गुलामब्बस हामी, रा.अजय अपार्टमेंट, फ्लॅट नंबर ८२, ८ वा माळा, १६ हन्सरज लेन, भायखला पोलीस स्टेशन जवळ, विर जिजामाता भोसले उद्यान, मुंबई-४०००२७ यांनी खालील नमूद केलेली शेतजमीन मिळकत, सदरील जमीन मिळकतीचे ज्ञात मालक श्री. तुकाराम हरी म्हात्रे, वगैरे १२, सर्व रा.जिते, ता.पेण, जि.रायगड यांचेकडून कायम मालकीहक्काने खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत उभय पक्षकारांमध्ये व्यवहाराच्या वाटाघाटी पुर्ण होउन दिनांक २८/०३/२०२४ रोजी बयाणा पावती दस्त अस्तित्वात आणून आमचे अशिलांकडून, बयाणाची रक्कम जमीन मालकांनी उचल केलेली आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.-पैसे) |
|---|---|---|---|
| जिते | ८३/५/अ | ००-२०-६० | ५-३८ |

वरील जमीन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरील जमीन मिळकतीचे ज्ञात मालकांनी, आमचे अशिलांना दिला आहे. तरी देखील सदर जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा, व्यक्तींचा, जमीनीचे मुळ मालकांचा अगर त्यांचे वारसांचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिन, लिज, बक्षिस, बयाणा पावती, खरेदी, साठेकरार, इतर कोणताही करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा, वसूली, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणी दावा, महसुल वाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येउन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरील जमीन मिळकतींबाबत आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर, खरेदीचा अंतिम व्यवहार नोंदणीद्वारे पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे व याची सर्वांनी नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर केले असे.

पेण
दिनांक :- २०/०४/२०२४

**ॲड. सरिता प्रविण माळी**
फ्लॅट नंबर २०१/०९ ए, भालचंद्र कॉम्प्लेक्स, ए विंग,
दुसरा मजला, वीर सावरकर मार्ग, गोविंद बाग, कौंडाळतळे,
मु. पो. ता. पेण जिल्हा रायगड. - ४०२१०७
भ्रमणध्वनी क्र. ८९८३४३५१९६/७४४७६७०५५५

शिक्का

निवडक

## दुर्गामाता वर्धापन दिन सोहळा

**पनवेल :** स्व. बहिणाबाई उकर्डाजी दुधे यांच्या स्मरणार्थ २४ वा. दुर्गामाता वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने अभिषेक त्यानंतर ओंकार प्रसादिक भजन मंडळ आसरोटी यांचे भजन, सुप्रसिध्द गायक तरुण दल अँड पार्टी माता कि चौकी, सायंकाळी आरती, स्वर संगीत भजन मंडळ व सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच त्यानिमित्ताने स्नेहकुंज आधार गृह, नेरे व साई आश्रय वृध्दाश्रम, पनवेल येथे अन्नधान्य वाटप करण्यात येणार आहे.

## तरुणीवर अत्याचार

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये राहणाऱ्या एका तरुणीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक बाब वाशीमध्ये घडली आहे. याबाबत पीडित तरुणीने खारघर पोलिसांना दिलेल्या तक्रारीमध्ये मागील दोन वर्षांत वाशीमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने हा अत्याचार केल्याचे सांगितल्यावर पोलिसांनी याबाबत बलात्कार व फसवणुकीचा गुन्हा या व्यक्तीविरोधात नोंदविला आहे.अत्याचार करणाऱ्या व्यक्तीने मोठ्या पदावर काम करत असल्याचे भासवून या पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून प्रेमात अडकवले होते.

## स्वच्छतेसाठी मानले आभार

**पनवेल :** रमझानच्या महिन्यात पनवेलच्या मोहल्यामध्ये नियमित सफाई व स्वच्छता केल्याबद्दल सिटीजन वेल्फेअर असोसिएशनने पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.प्रशांत रसाळ व त्यांच्या कर्मचाऱ्यांचे भेटून आभार मानले आहेत. सिटीझन वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला यांच्यासह त्यांच्या पदाधिकारी यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.प्रशांत रसाळ यांची भेट घेतली.यावेळी त्यांनी दिलेल्या आभार पत्रामध्ये समाधान व्यक्त केले आहे.

## शालेय साहित्य वाटप

**माणगाव :** शेअरिंग अँड सर्विंग पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट चेन्नई डिस्ट्रीब्यूशन ऑफ फ्री एज्युकेशनल इक्विपमेंट मुंबई यांच्यावतीने सविता शिंदे यांनी शालेय साहित्याचे वाटप केले. जिल्ह्यातील माणगावनजीकच्या लोणशी आदिवासीवाडी व रिळे शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर, पाणी बॉटल, वह्या प्रत्येकी १ डझन, जेल पेन बॉक्स, बॉल पेन बॉक्स, पेन्सिल, रबर, शार्पनर प्रत्येक मुलाला एक बॉक्स या प्रमाणात भेट स्वरूपात दिले.


## बक्षीस वितरण समारंभ

**माणगाव :** माणगावतालुकाएज्युकेशनसोसायटी दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड जीसीयूबी सायन्स अँड कॉमर्स कॉलेज गोरेगावमध्ये मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष पदवीदान तसेच महाविद्यालयाच्या वार्षिक बक्षीस वितरण समारंभाचे बुधवारी (दि.२४)सकाळी नऊ वाजता आयोजन करण्यात आले आहे. या महाविद्यालयामधील विद्यार्थी, सन २०२२-२३ मध्ये उत्तीर्ण तृतीय वर्षाचे विद्यार्थी तसेच सर्व पालक यांनी समारंभासाठी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगडमध्ये अघोषित भारनियमन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**उष्णतेच्या लाटेत रायगडमधील नागरिक होरपळून निघत आहेत. त्यातच सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे येथील नागरिक अधिकच हैराण झालेत. वीज खंडित होण्याचे प्रमाण ग्रामीण विभागात सर्वाधिक आहे. कधीकधी दिवसभर गेलेली वीज रात्री तीन–चार तासांसाठी येते. मान्सूनपूर्व दुरुस्ती, झाडांच्या छाटणीच्या कामामुळे वीजपुरवठा खंडित करत असल्याचे महावितरणकडून सांगण्यात येत आहे.**



मान्सूनचे आगमन होण्यास अद्याप दोन महिने बाकी असताना महावितरण कंपनीने कधीच इतकी तत्परता दाखवलेली नव्हती. त्यामुळे शहरी भागातील वाढती मागणी पुरवण्यासाठी ग्रामीण भागात अघोषित भारनियमन सुरू केले की काय, अशी शंका येथील नागरिक व्यक्त करीत आहेत.

जिल्ह्यात काही दिवसांपासून ३५ ते ३८ अंश इतक्या कमाल तापमानाची नोंद होत आहे. उकाडा कमालीचा वाढला आहे. दिवसभर अंगाची लाहीलाही होत आहे. शहरी भागातील नागरिकांकडून यासाठी एसी, पंखे, कुलर, फ्रीजचा वापर वाढला आहे. त्यामुळे विजेची मागणीही साधारण १५ टक्क्यांनी वाढली आहे; मात्र ही मागणी पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भागातील वीजपुरवठा खंडित केला जात असल्याचे येथील लोकांचे म्हणणे आहे.

जिल्ह्याच्या कोणत्या ना कोणत्या भागात दररोज किमान एक ते दोन तास वीजपुरवठा खंडित होत आहे. अतिरिक्त भार वाढत असल्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याचा दावा महावितरण करीत आहे; तर वाढलेल्या उष्णतेमुळे विद्युत रोहित्रांमधील तेल कमी होणे, काही यंत्रे नादुरुस्त होण्याचे प्रकार घडत असल्याने दुरुस्तीची कामे वाढली असल्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

> **उष्णतेच्या लाटेत विजेचा वापर नक्कीच वाढला आहे. जिल्ह्यातील काही ठराविक भागातच हे दिसून येत आहे. तेथील पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कदाचित कमी वापर असलेल्या ठिकाणचा वीजपुरवठा बंद केलेला असेल. त्याचबरोबर वाढलेल्या तापमाणात यंत्रसामुग्रीही नादुरुस्ती होत असते. एप्रिलपासून दर मंगळवारी मान्सूनपूर्व कामांच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आलेले आहे. यात झाडांची छाटणी, विद्युत वाहिनींची दुरुस्ती केली जात आहे.**
>
> **– ए. यू. मुलाणी, मुख्य कार्यकारी अभियंता, महावितरण, पेण**

गेल्या काही दिवसांपासून सकाळ, दुपार, सायंकाळ असे वेळी-अवेळी वीजपुरवठा खंडित होत आहे. रोहा, खालापूर, सुधागड, पोलादपूर परिसरात कायमच वीज गायब होत असल्याच्या तक्रारी आहेत. तालुक्यांच्या गावात दुपारच्या वेळी अर्धा ते पाऊण तास वीजपुरवठा खंडित होत आहे.

सकाळच्या वेळेत नागरिकांची कामावर जाण्याची गडबड आणि त्यात वीज गेल्याने कामे खोळंबून पडत आहे. दुपारी पुरवठा खंडित होत असल्याने उकाड्यात वाढ होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक हैराण होत आहेत. दिवसातून अर्धा ते पाऊण तास वीजपुरवठा खंडित होत आहे. ऐन उन्हाळ्यात दुपारच्या वेळेत विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

## अनिरुध्द राणे यांची नागावमध्ये आज शोकसभा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


शेतकरी कामगार पक्षाचे नागाव येथील युवा नेते अनिरुध्द मंगेश राणे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांची शोकसभा शनिवारी (दि.२०) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ग्रुपग्रामपंचायत नागावमधील सभागृहात होणार आहे.



यावेळी नागाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, विद्यमान सरपंच हर्षदा मयेकर, उपसरपंच सुरेंद्र नागलेकर, सदस्य निखील मयेकर यांच्यासह अनेक सदस्य, ग्रामपंचायतीचे कर्मचारी, आशा स्वयंसेविका व ग्रामस्थ उपस्थित राहणार आहे.

अनिरुध्द राणे हे नागाव ग्रामपंचायतीचे सदस्य होते. राजकीयबरोबरच सामाजिक क्षेत्रात ते सक्रीय होते. शनिवारी (दि.१३) सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. रविवारी त्यांच्या पार्थिवावर नागाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. अनिरुध्द राणे यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली.

## शेलू येथे रस्त्याच्या कडेला प्लास्टिक पिशव्यांचा खच



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत कल्याण रस्त्यावर शेलू गावाच्या हद्दीत रस्त्याच्या दोन्ही बाजूला गेली काही महिने सातत्याने प्लास्टिक पिशव्यांचा कचरा टाकून दिला जात आहे. कर्जत तालुक्यात स्वागत रस्त्याच्या आजूबाजूला पडलेल्या प्लास्टिक पिशव्या करताना दिसत आहेत. दरम्यान या सर्व कचऱ्याबाबत शेलू ग्रामपंचायत प्रशासन ढिम्म असल्याचे दिसून येत आहे.

शेलू ग्रामपंचायत मधील कचरा हा ग्रामपंचायतीकडून दररोज उचलला जातो आणि तो कचरा डम्पिंग ग्राउंडवर टाकण्यात येतो. कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर शेलू गावाच्या प्रवेश मार्गापासून पुढे साधारण १५० मीटर रस्त्याच्या आजूबाजूला प्लास्टिक कचऱ्याचे ढीग आढळून येत आहेत. हा कचरा शेलू ग्रामपंचायतीकडून आणून टाकण्यात येत नसल्याचे मावळते सरपंच शिवाजी खारीक यांचे म्हणणे आहे. मग त्या भागात अस्ताव्यस्त पडून असलेला कचरा कोणत्या व्यक्तीकडून टाकण्यात येतो. याबद्दल सध्या कोणालाही कोणतीही माहिती नाही. प्लास्टिक पिशव्यांच्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

कचरा टाकणाऱ्या व्यक्ती विरुद्ध कारवाई करायला शेलू ग्रामपंचायत प्रशासनाला वेळ नाही. ग्रामपंचायतीकडून तेथे कचरा टाकला जाऊ नये अशी कोणतीही फलकबाजी करण्यात आलेली नाही. त्याचवेळी या ग्रामपंचायतीमधील प्रशासक यांच्याकडून एकदाही संबंधितांवर कारवाई व्हावी असा प्रयत्न केला गेला नाही.

प्लास्टिक पिशव्यांचा कचरा पाडण्याचे प्रमाण वाढले आहे. बेकायदा प्लास्टिक पिशव्यांचा आणि कचरा टाकणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीकडून सीसीटीव्ही कॅमऱ्यांचे जाळे बसविण्याची गरज आहे, असे असे अर्जुन तरे यांनी सांगितले.

## यशवंतराव मोरे यांचे निधन

**। रसायनी । वार्ताहर ।**

कोयना धरण प्रकल्पग्रस्त जनतेचा आधारस्तंभ आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे यशवंतराव गोपाळराव मोरे यांचे अचानक आज पहाटे निधन झाल्याने संपूर्ण कोयना धरण प्रकल्पग्रस्त आणि कोकणावर शोककला पसरली आहे. मृत्यू समयी ते ७५ वर्षांचे होते.



रायगड, ठाणे, पालघर, सातारा, रत्नागिरी येथे विखुरलेला कोयना धरण प्रकल्पग्रस्त जनतेला एकसंघ ठेऊन त्यांच्या नागरी सुविधा, पर्यायी जमीन, प्रकल्पग्रस्त दाखला, कला, क्रीडा, सामाजिक बांधिलकी यासाठी सातत्याने त्यांनी पाठपुरावा केला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे अशी यशवंतराव मोरे यांची ओळख होती. पालघर जिल्ह्यातील उचाट या कोयना पुनर्वसित गावात त्यांनी गावच्या,परिसरातील आणि समाजातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी शिक्षण, सामाजिक, क्रीडा, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, शासकीय अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामदैवतांची आज जत्रा

**पोलादपूर :** तालुक्याचे आराध्य आणि पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी रवळनाथांचे भैरवनाथनगर सहाणेवर आगमन होत असून विविध ग्रामदैवतांच्या काठ्या-पालख्यांचेही यावेळी आगमन होणार असल्याने तब्बल लाखभर भाविकांची जत्रौत्सवाप्रसंगी रेलचेल होणार असल्याची शक्यता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाबूराव महाडीक यांनी व्यक्त केली आहे. ग्रामस्थ या जत्रौत्सवास आवर्जून उपस्थित राहण्यासाठी मुक्कामी येऊ लागले आहेत.

## महामार्गावरील सावली हरवली

**। महाड । वार्ताहर ।**

सध्या उन्हाचा पारा वाढत चालल्याचे चित्र पाहायला मिळत असून वाढत्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. जिल्ह्यातील तापमान ४२ अंशांच्या वर पोहोचलेले दिसत आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. याचा फटका मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनादेखील बसल्याचे दिसत आहे. महामार्गाच्या कामासाठी बाजूला असणाऱ्या झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाली असून सावली हरवली आहे.

मुंबई-गोवा महामार्ग हा नेहमी वर्दळीचा आहे. या महामार्गावरून दररोज हजारोंच्या संख्येने वाहनांची वर्दळ असते. मात्र, महामार्गावरील सावली पूर्णपणे हरपली असून उन्हातून प्रवास करणे घातक ठरत आहे. विशेष करून दुचाकीस्वारांना उन्हाची झळ अधिकच बसत आहे. त्यामुळे दुपारच्या वेळेस महामार्ग सामसूम असल्याचे दिसत आहे.

१२ वर्षांपूर्वी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. त्या वेळी जुन्या महामार्गावर ठिकठिकाणी जवळपास १०० ते २०० वर्षांपूर्वीची जुनी झाडे उभी होती. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर सावली मिळत होती व महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या सावलीचा आश्रय मिळत होता. महामार्गाचे काम सुरू करण्यात आल्यानंतर महाड-पोलादपूरच्या दरम्यान महामार्गाच्या लगत असलेली हजारो झाडे पूर्णपणे तोडण्यात आली. महामार्गाचे काम वेगाने सुरू होऊन काम पूर्णत्वास गेल्याचे दिसत आहे. महामार्ग आता पूर्ण मोकळा दिसत असून सावली हरपली आहे. महामार्गाचे काम झाल्यानंतर महामार्गालगत नवीन झाडे लावणे गरजेचे होते; मात्र तसे होताना दिसत नसून प्रवासी व नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. सध्या महामार्गावरून प्रवास करताना कुठेही सावलीचा आश्रय मिळत नाही.

## मराठा समाज अध्यक्षपदी धनंजय साजेकर

**। राबगाव /पाली । वार्ताहर ।**



सुधागड तालुका मराठा समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा शेकडो लोकांच्या उपस्थितीमध्ये पाली येथे मराठा समाज भवनातील स्व.स.स. साजेकर सभागृहात संपन्न झाली.

या सभेमध्ये धनंजय सटुराम साजेकर यांची सर्वानुमते दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. या सभेत वरील कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी करिता कार्याध्यक्षपदी बळीराम विष्णू निंबाळकर, सरचिटणीसपदी सुजीत सदाशिव बारसकर व खजिनदारपदी योगेश हनुमंत मोरे या पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

संचालकपदी वकील गटातून नितीन मोरेश्वर शेवाळे यांची तर अकाऊंटंट गटातून अरविंद मारुती दंत यांची निवड करण्यात आली. समाजासाठी काम करणाऱ्या महिला संचालिका म्हणून शुभदा पाटील, निहारिका शिर्के, साक्षी दिघे, समृध्दी यादव, रुपाली भणगे यांची निवड करण्यात आली.

## रोह्यात उरुसाची जय्यत तयारी

**रोहा :** रोहा शहरातील प्रसिध्द गाझी शेख सलाऊद्दीन शाह बाबा दर्गाचे उरुस २० व २१ एप्रिल रोजी साजरा होणार आहे. या निमित्ताने कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये कव्वालीचे जंगी सामने रंगणार आहेत. या दोन दिवसीय कार्यक्रमात हिंदू मुस्लिम बांधव बाबांचे दर्शन घेतात. उरुस कार्यक्रमाची तयारी सुरू असल्याची माहिती उरुस कमिटीचे अध्यक्ष नसीम महाडकर यांनी दिली आहे.

## म्हसळ्यात जलस्त्रोत आटले

**। म्हसळा । वार्ताहर ।**

गेल्या काही दिवसांपासून म्हसळा तालुक्यातील तापमान प्रचंड वाढले आहे. तालुक्यात ३८ ते ४० अंश सेल्सिअस तापमान आसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे अनेक भागांतील पिण्याचे स्त्रोत आटत आहेत. पाणीसाठा कमी होत चालला आहे. तालुक्यातील गाव-वाडी-वस्तीवर पिण्याचे दूषित पाणी पुरविले जात आहे.

मेंदडी पाझर तलावातील साठा कमी झाल्याने पाण्यातील जलपर्णी, वनस्पती आणि चिखलामुळे पाण्याला दुर्गंधी येत आहे. पाण्याचा रंग बदलण्याचा प्रकार मागील वर्षी एप्रिल-मे महिन्यामध्ये झाला होता. ग्रामपंचायत मेंदडी, वारळ, कळसुरी, तुरुंबाडी येथील पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत मेंदडी पाझर तलाव आहे. तेथील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे पाझर तलावातील पाणी पिवळसर आणि गढूळ झाल्याचे दिसत आहे. मेंदडी पाझर तलावाच्या पाण्यावर सहा हजार नागरिक अवलंबून आहेत. यामध्ये पाच ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- विहिरी - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- उजाला विवाह मंडळ, मुंबई उजाला ज्योतिष क्लासेस, रायगड Mob No.: 9324987050
- अलिबागमध्ये ब्लॉक व दुकानाचे गाळे भाड्याने देणे आहे. संपर्क : मोबाईल ९८२२०३१०१७/९०२८५६५९१७
- हॉस्पिटलमध्ये कामासाठी अनुभवी स्टाफची आवश्यकता आहे. नर्स (ANM/GNM) वॉर्डबॉय, मावशी) अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल. मो. ९३२१३०३९३८, ९११९५६५०२२, ७७४५०५००२५
- अलिबाग येथे मोठा फ्लॅट (2BHK) विकणे आहे. किंमत रूपये ७४ लाख (Negotiable) ८२७५११९८८३
- बाईक व लाईसन्स आवश्यक किमान १२ वी पास. १) अलिबागमध्ये मोबाईल सेल्स व डिल्हीवरी, २) पेणमध्ये मोबाईल सेल्स व डिल्हीवरी, ३) रोहा/माणगाव मोबाईल सेल्स व डिल्हीवरी पार्ट टाईम, फुल टाईम, पगार १०,००० पासून पुढे. मोबाईल - ८८८८२२०२२१
- इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी (हेल्पर) गरजू मुलांची गरज आहे. ९२७०६१४०७७ (चेंढरे-गोंधळपाडा)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## साळाव-तळेखार रस्ता नादुरूस्त

**रेवदंडा:** साळाव ते तळेखार रस्त्याची पुरती दुरावस्था झाली असून अनेकदा लहान मोठी अपघात घडून आली आहेत.मात्र सार्वजनिक बांधकाम खात्याचे या रस्ताकडे पुरते दुर्लक्ष झाले आहे.

शिवसेना शिंदे गटाचे मुरूड उपतालुका युवा अधिकारी विकी वेगस् यांनी याबाबत मुरूड सार्वजनिक बांधकाम खाते यांच्याकडे रस्त्याच्या दुरवस्थेबाबत निवेदन अर्ज दिले आहे. या निवेदन अर्जासह त्यांनी साळाव ते तळेखार दरम्यान पडलेल्या असंख्य खड्डयाचे छायाचित्र सुध्दा जोडले आहेत. या रस्त्याने साळाव जेएसडब्लू कंपनीची कंपनीतील मालवाहतुक ट्रक नित्याने जा-ये करत असल्याने रस्त्याची दुरावस्था झाली असल्याचा आरोप स्थानिक प्रवासीवर्ग करत आहेत.

## पाण्याच्या टाकीचे काम पाच वर्षांपासून ठप्प

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ प्रादेशिक नळपाणी योजना मधील एक जलकुंभ जुम्मापट्टी येथे नियोजित करण्यात आले आहे. मात्र त्या ठिकाणी जलकुंभ बांधण्यासाठी सहा महिन्यपूर्वी खोदकाम करण्यात आले होते. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम सहा महिन्यात पुढे जाऊ शकले नाही. नळपाणी जलकुंभाचे बांधकाम रखडले असल्याने नेरळ नळपाणी योजनेचे काम देखील रेंगाळले असून त्यामुळे नेरळ ग्रामस्थांचे तोंडाचे पाणी पळाले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून नेरळ नळपाणी योजनेच्या कामाचा ठेका मार्च २०२३ रोजी देण्यात आला आहे. या नळपाणी योजनेमध्ये पाणी साठवण टाक्या वेगवेगळ्या ठिकाणी बांधल्या जाणार आहेत. मात्र सव्वा वर्षात नेरळ गावात उभारण्यात येणाऱ्या नळपाणी योजनेमधील एकही जलकुंभाचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे नेरळ प्रादेशिक नळपाणी योजनेचे तीनतेरा वाजले आहेत.

जुम्मापट्टी येथे जलकुंभ बांधले जाणार असून तेथे असलेल्या लोकवस्तीच्या तुलनेत कमी लिटर क्षमतेची साठवण टाकी मंजूर केली आहे. जुम्मापट्टी येथील पाण्याचे जलकुंभ हे २५ हजार लिटर क्षमतेचे आहे. मात्र तेथील लोकवस्ती लक्षात घेता येथील पाण्याचे जलकुंभ हे किमान दीड ते दोन लाख लिटर क्षमता असायला हवी होती अशी सूचना ग्रामपंचायतचे माजी सदस्य सुनील पारधी यांनी केली आहे.

# पनवेल तालुक्यात १३ ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा

**। पनवेल । वार्ताहर ।**

**यंदा उन्हाळा दिवसेंदिवस वाढू लागला आहे. त्यातच पाणी टंचाई जाणवू लागली आहे. ठिकठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले असून पाण्यासाठी काही ठिकाणी नागरिकांना वणवण भटकावे लागत आहे. पनवेल तालुक्यातील तेरा ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.**

पनवेल तालुक्यातील शिरढोण, शिरढोण पाडा, आपटा-माडभुवन, आपटा घेरावाडी, कोरळ, आष्टे, कसळखंड-शिवाजीनगर, आरीवली, कसळखंड फणसवाडी, कसळखंड, लोणीवली ठाकूरवाडी, वारदोली हालटेपवाडी, ताराटेपवाडी या १३ ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती पनवेल पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली. शिरढोण येथे दिवसातून ३ टँकर, शिरढोण पाडा येथे ६ टँकर, आपटा-माडभुवन येथे २ टँकर, आपटा घेरावाडी येथे १ टँकर, कोरळ येथे १ टँकर, आष्टे येथे दिवसाआड १ टँकर, कसळखंड-शिवाजीनगर येथे दिवसाआड १ टँकर, आरीवली येथे १ टँकर, कसळखंड फणसवाडी येथे दिवसाआड १ टँकर, कसळखंड येथे ४ टँकर, लोणीवली ठाकूरवाडी येथे ४ दिवसांनी १ टँकर, वारदोली हालटेपवाडी येथे १ टैंकर आणि ताराटेपवाडी येथे देखील रोज १ टँकरने पाणीपुरवठा केला जातो.



पनवेल तालुक्यातील देहरंग धरणातून पनवेल शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र याच परिसरात राहणाऱ्या आदिवासी बांधवाना रणरणत्या उन्हात घोटभर पाण्यासाठी ऐन उन्हाळ्यात वणवण करावी लागत आहे. त्यामुळे आदिवासीं बांधवांना उन्हाचे चटके सोसत पाण्यासाठी भटकावे लागत आहे.

पाण्यासाठी येथील महिलांना दोन, तीन किलोमीटर पायी चालत जावे लागते. गाव- वाड्यांवरील नागरिकांना पाण्यासाठी मार्च महिन्यापासूनच पायपीट करावी लागत आहेत. तर त्यापुढील मे, जून महिन्यात यापेक्षाही भयानक परिस्थिती निर्माण होणार आहे, अशी भीती नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, एप्रिल महिना सुरु होऊन काही दिवस उलटले आहेत. त्यामुळे उन्हाळ्याच्या तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. उन्हामुळे अंगाची लाही होत आहे. त्यातच आता नागरिकांना पाणीटंचाईची समस्या सतावत असल्याने त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे दिसून येत आहे.

> ***उन्हात उपाशीपोटी घराबाहेर पडल्यास चक्कर तसेच सनस्ट्रोक होण्याची भिती असते. त्यामुळे नागरिकांनी उपाशीपोटी घराबाहेर पडू नये. तसेच सतत पाणी पिणे आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याची बाटली सोबत ठेवा. शक्यतो पूर्ण बाही असलेले सुती कपडे घातल्यास घामाचा परिणाम होत नाही. दुपारी १२ ते ३ वाजेच्या दरम्यान घराच्या बाहेर पडणे टाळावे.***
>
> ***– डॉ.आनंद गोसावी मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल***

# हिमालयातील सुंदर देश

**सफर देशांची**

भूतान हा भारताचा शेजारी देश. हिमालयात वसलेला हा अत्यंत छोटा देश आहे. थिंपू ही भूतानची राजधानी. भूतानी लोक डीझोंखा ही भाषा बोलतात. भूतानची लोकसंख्या सहा लाखांच्या आसपास आहे. भूतानमधले ९७ टक्के लोक बौद्धधर्मीय आहेत. इथल्या लोकांना आपल्या संस्कृतीचा खूप अभिमान आहे. इथल्या पारो शहरात या देशातला एकमेव विमानतळ आहे. या देशाची दक्षिण सीमा भारताशी जोडलेली आहे तर उत्तर सीमा तिबेटशी जोडलेली आहे. भूतानमधून हायड्रोइलेक्ट्रिसिटीची निर्यात केली जाते. भूतानची अर्थव्यवस्था लहान असली तरी वेगाने वाढत आहे. एनगुल्ट्रम हे इथलं चलन आहे. या चलनाचं मूल्य भारतीय रूपयाच्या बरोबरीचं आहे.




भूतानच्या लष्करात १६ हजार सैनिक आहेत. संरक्षणासाठी हा देश भारतावर अवलंबून आहे. जमिनीने वेढलेला असल्याने त्यांचं नौदल नाही तसंच वायूदलही नाही. भूतान हा निसर्गसंपन्न देश आहे. इथला ७० टक्के भूभाग जंगलाने व्यापलेला आहे. या देशात पक्ष्यांच्या ७७० पेक्षा जास्त प्रजाती आढळतात. इथे ५४०० प्रजातींच्या वनस्पतीही आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे प्राणीही इथे आढळतात. तिरंदाजी हा इथला राष्ट्रीय खेळ आहे. इथे फुटबॉलही बराच लोकप्रिय आहे. टकिन या देशाचा राष्ट्रीय प्राणी आहे.

भूतानमध्ये राजेशाहीचं अस्तित्त्व आहे. पण इथले लोकशाही पद्धतीने निवणुकांचं आयोजनही केलं जातं. भूतानमध्ये पैशांपेक्षा लोकांच्या आनंदाला महत्त्व दिलं जातं. इथली श्रीमंती लोकांच्या आनंदावर अवलंबून असते. हा सुखी समाधानी असा देश आहे. १९७० नंतर भूतानने आपली दारं परदेशी लोकांसाठी खुली केली. भूतानी लोक पारंपरिक वेशच परिधान करतात. आपली संस्कृती जपण्याचा इथल्या लोकांचा प्रयत्न असतो.

# प्लेट असावी कशी?

**स्टे हेल्दी**



'मुलांनो, आपला आहार चौरस आणि संतुलित असायला हवा. त्यासाठी तुमच्या ताटात सर्व पोषक घटक आहेत की नाही, याची तपासणी करा. यासाठी खालील बाबी जाणून घ्या.

✻ कर्बोदके: तांदूळ, रोटी, पुलाव, पराठा, पोहे, पास्ता आणि नूडल्स हे कर्बोदके आणि फायबरचे चांगले स्रोत आहेत.

✻ प्रथिने: राजमा, चणे, हरबरा डाळ, उडीद डाळ, मूग, स्प्राउट्स, सोयाबीन, चिकन, अंडी आणि मासे हे प्रथिनांचे चांगले स्रोत आहेत.

✻ जीवनसत्त्वे आणि फायबर: भाज्या, सॅलड, कोशिंबीर, सार, करी, ग्रेव्हीज, आणि हंगामी भाज्यांमध्ये आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर असतात.

✻ प्रोबायोटिक्स: रायता, दही, ताक आणि पनीरमध्ये प्रथिने, कॅल्शियम, प्रोबायोटिक्स असतात. ते अन्न पचण्यास मदत करतात.

✻ आपल्या जेवणाची सुरुवात सॅलडने करावी. त्यात भरपूर फायबर असते. जेवणात प्रत्येक रंगाची फळे आणि भाज्या मिसळा.

✻ तुमची प्लेट चार भागांमध्ये विभाजित करा. त्यातील १/२ भाज्या आणि फळे भरा. त्यात प्रत्येक रंगाच्या आणि प्रत्येक प्रकारच्या भाज्या असाव्यात. उदाहरणार्थ, त्यात हिरव्या पालेभाज्या, ब्रोकोली, गाजर, सिमला मिरची असे सर्व काही समाविष्ट करा. आतडे तज्ज्ञांच्या मते, आपण आठवड्यातून कमीत कमी ३० प्रकारच्या वनस्पती आणि फळे तसेच भाज्या खाल्ल्या पाहिजेत. बटाटे कमी खा आणि उकळल्यानंतरच खा. मुलांनो, लक्षात राहील ना हा नियम?

# तिथे पडतो लोखंडाचा पाऊस

**स्मार्ट टेक**


मुलांनो, आपल्या सौरमालेच्या बाहेर एक खास ग्रह असून त्याला 'डब्ल्यु-एसपी ७६ बी' हे नाव दिले गेले आहे. सूर्यमालेच्या बाहेरील ग्रहांना 'एक्सोप्लॅनेट' म्हणतात हे तुम्ही जाणत असाल. तर मुलांनो, या 'डब्ल्यु-एसपी ७६ बी' वर लोखंडी पावसासह इंद्रधनुष्य निर्मितीसारखी घटना घडते असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. म्हणूनच तो खास आहे. या प्रकारची घटना यापूर्वी कधीही सौरमालेबाहेर आढळून आली नव्हती. पण 'डब्ल्यु-एसपी ७६ बी' ची घटना पृथ्वीवरील इंद्रधनुष्याच्या निर्मितीसारखीच आहे, जी त्यावरील गोलाकार आणि एकसमान कणांनी बनलेल्या ढगांची उपस्थिती सूचित करते.

मुलांनो, 'डब्ल्यु-एसपी ७६ बी' हा वायूचा गोळा आहे असून पृथ्वीपासून ६३७ प्रकाशवर्षांच्या अंतरावर आहे. २०१३ मध्ये याचा शोध लागला. तो त्याच्या मूळ पिवळ्या ताऱ्यापासून फक्त ४८ दशलक्ष किलोमीटर दूर आहे. या ताऱ्याचे वस्तुमान सूर्याच्या १.५ पट आणि रुंदी १.७५ पट आहे. यजमान तारा जवळ आल्याने त्यावर लोखंडाचा पाऊस पडतो. समीपतेमुळे, याच्या एका बाजूला सतत प्रकाश असतो. पण हेच तापमान २,४०० अंशाच्या वर वाढते तेव्हा धातूंचे बाष्पीकरण होते. 'डब्ल्यु-एसपी ७६ बी' वरील अशा तापमानात, लोखंडाचे वाफेत रूपांतर होते आणि जोरदार वारे ही लोखंडी वाफ ग्रहाच्या दुसऱ्या बाजूला घेऊन जातात जेथे नेहमी थंड रात्री असतात. त्यामुळे लोखंडी ढग तयार होऊन त्यावर लोखंडी पाऊस पडतो.

अमेरिकेची स्पेस एजन्सी नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सीच्या चीओप्स मिशनमध्ये ही माहिती समोर आली आहे. शास्त्रज्ञ ग्रहाच्या पूर्वेकडील टर्मिनेटरमध्ये एक विचित्र प्रकाश विसंगती समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. दिवस आणि रात्र यांच्यातील सीमारेषेला 'ईस्टर्न टर्मिनेटर' म्हणतात. येथे वैज्ञानिकांना ग्रहाच्या पूर्व टर्मिनेटरमधून प्रकाशात वाढ झाल्याचे आढळले. शास्त्रज्ञ म्हणतात की, पूर्व टर्मिनेटरमध्ये प्रकाशात ही अनपेक्षित वाढ ग्लोरी इफेक्ट दर्शवते. ही एक घटना आहे ज्यासाठी विशिष्ट परिस्थिती आवश्यक असते.

# झटपट बदला जीमेलचा पासवर्ड

**वेब ग्यान**




जीमेल वापरणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. जीमेलमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने काही बदल करण्यात आले आहेत. तुम्हाला जीमेलचा पासवर्ड बदलण्यासाठी एक मिनिट पुरेसं आहे. कसं ते पाहू या.

✻ जी मेलच्या होमस्क्रीनवर जा. इथे उजव्या बाजूला तुमच्या प्रोफाइल पिक्चरवर क्लिक करा. इथे 'माय अकाउंट' हा ऑप्शन दिसेल. त्यावर क्लिक करा.

✻' माय अकाउंट' मध्ये तुम्हाला बरेच पर्याय दिसतील. त्यापैकी 'साईन इन अँड सिक्युरिटी'वर क्लिक करा.

✻ 'साईन इन अँड सिक्युरिटी'मध्ये थोडं खालच्या बाजूला गेल्यावर 'पासवर्ड अँड साइन इन मेथड' हा ऑप्शन दिसेल. इथे तुम्हाला पासवर्ड, टू स्टेप व्हेरिफिकेशन, ॲप पासवर्ड आणि गुगल अकाउंट पिनशी संबंधित माहिती मिळू शकेल. तसंच या ऑप्शन्सवर क्लिक करून तुम्हाला त्यांचे पासवर्डही बदलता येतील. पासवर्ड बदलण्यासाठी 'पासवर्ड' या ऑप्शनवर क्लिक करा.

✻ 'पासवर्ड' बदलण्याआधी तुम्हाला जुना पासवर्ड टाकावा लागेल. त्यानंतर दोनदा नवा पासवर्ड टाकावा लागेल. दोनदा पासवर्ड टाकल्यानंतर 'चेंज पासवर्ड' या ऑप्शनवर क्लिक करा. आता तुमचा नवा पासवर्ड ॲक्टिवेट झालेला असेल.

# अशी होती पादत्राणे

**माहिती आहे?**

मित्रांनो, प्राचीन काळातील लोक खडबडीत जमिनीवर चालत असताना ओरडत असतील का? याचे उत्तर 'नाही' असे आहे कारण फुटवेअरला हजारो वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. अगदी जुन्या काळापासून लोक पादत्राणे वापरत आहेत. सर्वात जुने पादत्राणे, बहुधा चट्टेदार गवत किंवा पायाला धरून ठेवणाऱ्या कच्च्या कातडीपासून बनविलेले असावी. शास्त्रज्ञांचा अंदाज आहे की, पहिली पादत्राणे हिमयुगात प्राण्यांच्या त्वचेपासून बनवली गेली होती. ३३०० बीसी पूर्वीचे प्राचीन शूज फ्रेंच आल्प्समध्ये सापडले आहेत. इजिप्शियन, चिनी आणि वायकिंग्स यांसारख्या प्राचीन संस्कृतीतही पादत्राणांची उदाहरणे अस्तित्वात आहेत. मानव विविध वर्गांमध्ये विभागला गेला तसतसे श्रीमंत आणि प्रभावशाली लोक बुटांवरील कारागिरी आणि सजावटीद्वारे स्वतःला वेगळी ओळख देऊ लागले. सुमारे ३००० ईसापूर्व इजिप्तच्या शासकांच्या चित्रांमध्ये फेरो आणि त्यांचे गुलाम त्यांनी चप्पल धारण केल्याच्या प्रतिमा दिसतात. त्या सूचित करतात की, प्राचीन इजिप्तमध्ये चप्पल हे शक्ती आणि पदाचे चिन्ह होते. प्राचीन काळातील ग्रीक लोक आपल्या पायांची देखील चांगली काळजी घेत असत. आरामदायी पादत्राणांचा वापर करत असत.



# इटलीमध्ये मिळेल संधी

**कोण होणार?**




सध्या परदेशी भाषांना खूप महत्त्व आलं आहे. एखादी भाषा शिकल्यानंतर तुम्हाला अनेक संधी मिळू शकतात. इटालियन ही सुद्धा अशीच एक भाषा आहे. जगभरात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये इटालियन भाषेचा चौथा क्रमांक आहे. त्यामुळे ही भाषा शिकल्यानंतर तुम्ही बरंच काही करू शकता.

इटली आणि भारत या दोन्ही देशांमध्ये चांगले संबंध आहेत. बऱ्याच इटालियन कंपन्यांनी भारतात गुंतवणूकही केली आहे. तसंच इटली सरकारतर्फे इटालियन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप दिली जाते. अनेक भारतीय विद्यार्थी ही स्कॉलरशीप घेऊन इटलीला जातात. इटालियन भाषेवर प्रभूत्त्व मिळवण्यासोबतच तिथली संस्कृती जाणून घेण्याची संधीही त्यांना मिळते. तुम्ही इटलीमध्ये तीन ते सहा महिने राहू शकता.

इटालियन भाषा बऱ्याच विद्यापीठांमध्ये शिकवली जाते. प्रमाणपत्र, पदविका, पदविकोत्तर अभ्यासक्रम तर आहेतच. पण, तुम्ही या भाषेत पदवी मिळवू शकता. तसंच पीएचडीही करू शकता. फियाट, बेनेटन, लॉइड, फेरारी, मार्कोनी, पिनाकलसारख्या इटालियन कंपन्यांनी भारतात आपलं बस्तान बसवलं आहे. या कंपन्यांना इटालियन भाषा जाणणारे कर्मचारी हवे असतात. इटालियन भाषेत दुभाषा म्हणूनही तुम्ही काम करू शकता. इटली किंवा इतर देशांमध्येही नोकरीच्या संधी मिळू शकतात. लेखनाच्या क्षेत्रातही तुम्ही काम करू शकता. त्यामुळे परदेशी भाषा शिकायचा विचार करत असाल तर तुमच्याकडे इटालियन भाषेचा पर्यायही आहे.

# हाड मोडलं तर...

**हेल्थ वेल्थ**

खेळताना पडल्यामुळे किंवा इतर काही कारणांमुळे हाड मोडतं. शाळेत असताना किंवा घरी कोणी नसताना तुमचं हाड मोडलं तर घाबरून जाऊ नका. शरीरातल्या कोणत्याही भागातलं, कितीही छोटं हाड मोडलं असलं तरी उपचार करून घेणं गरजेचं असतं.

**हाड मोडलंय हे कसं समजावं?**

पडल्यानंतर ताडकन काही तरी मोडल्यासारखा आवाज आला, लागलेला भाग सुजला, संवेदना हरवल्यासारखं वाटत असेल तर हाड मोडलं असण्याची शक्यता असते.


**काय करावं?**

तुमचं किंवा मित्र-मैत्रिणीचं हाड मोडलं तर सर्वात आधी त्या भागावरचे कपडे काढायला हवेत. त्यानंतर कापडात गुंडाळलेला बर्फ लागलेल्या भागावर लावता येईल. दुखापत झालेला अवयव हलवू नका किंवा हाड पुन्हा बसवण्याचा प्रयत्न करू नका. हाड स्थिर रहावं यासाठी त्या भागावर आधार ठेवा. यामुळे डॉक्टरांकडे जाईपर्यंत तुम्हाला आराम मिळेल. असा आधार बनवण्यासाठी तुम्ही लाकूड, पुठ्ठा किंवा दुमडलेल्या वर्तमानपत्राचा वापर करू शकता. तातडीने डॉक्टरांकडे जा. शस्त्रक्रियेच्या आधी काहीही खाऊ किंवा पिऊ नका. हाड मोडलेल्या व्यक्तीने झोपायला हवं. जखम धुवू नका.



**काळजी**

फ्रॅक्चर होणं आपण टाळू शकत नाही. पण, थोडी काळजी घेऊ शकतो. रस्त्यावरून चालताना खड्ड्यांकडे नीट लक्ष द्या. खेळताना योग्य ती आयुधं वापरा. क्रिकेट खेळताना हेल्मेट, पॅड्सचा वापर करा. बाईकवरून जाताना हेल्मेट घालायला विसरू नका. सायकल चालवतानाही तुम्ही हेल्मेट घाला.




**ठिपके जुळवा**




**जिज्ञासा**

# ओळखा पाहू...

१) जगातला सर्वात व्यस्त समुद्री मार्ग कोणता?
२) पहिलं चिनी युद्ध कोणत्या दोन देशांमध्ये झालं?
३) नोकिया ही कोणत्या देशातली कंपनी आहे?
४) भारताविरूद्ध सामना खेळून कसोटी पदार्पण करणारा देश कोणता?
५) सलग तीन विम्बल्डन स्पर्धा जिंकलेली एकमेव महिला खेळाडू कोण?
६) उत्तर ध्रुवावर स्कीईंग करणारी पहिली महिला कोण?
७) कसोटी सामन्यात हॅटट्रिक नोंदवणारा पहिला भारतीय गोलंदाज कोण?
८) भारतीय संघ पहिला आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामना कुठे खेळला?
९) रायडर कप कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
१०) क्रिकेटमध्ये वापरल्या जाणाऱ्या स्टंपची लांबी किती असते?

उत्तर : १) उत्तर अटलांटिक मार्ग २) चीन आणि ब्रिटन ३) फिनलॅण्ड ४) अफगाणिस्तान५) स्टेफी ग्राफ ६) ॲन बॅनक्राफ्ट ७) हरभजन सिंग ८) हेडिंग्ले ९) गोल्फ १०) २८ इंच

# भन्नाट 'स्वीट सर्च'

**स्मार्ट टॉक**

मुला-मुलींनो, इंटरनेटशिवाय आपलं पान हलत नाही. माहिती मिळवण्यासाठी आपण गुगलचा वापर करतो. गुगल हे सर्च इंजिन आहे. पण तुम्हा लहानग्यांसाठी काही खास सर्च इंजिन आहेत. 'स्वीट सर्च' त्यापैकी एक. मुलांसाठीचं हे अत्यंत सुरक्षित असं सर्च इंजिन आहे. इथे दिसणाऱ्या वेबसाईट्सची संख्या मर्यादित असते. इतकंच नाही तर तुमच्यासाठी सर्वोत्तम वेबसाईट्सची निवड केलेली असते. त्यामुळे तुमचा सर्च खूपच सोपा होतो. एक लाख तासांच्या संशोधनानंतर तज्ज्ञ मंडळींनी सर्च इंजिनवरच्या वेबसाईट्सची निवड केली आहे. मुलांना सर्वोत्तम मिळावं असाच त्यांचा प्रयत्न आहे.

Sweet Search
A Search Engine for Students

इतर सर्च इंजिनमध्ये मागे टाकल्या जाणाऱ्या पण माहितीच्या बाबतीत सर्वोत्तम असणाऱ्या साईट्स या सर्च इंजिनच्या पहिल्या पानावर असतात. २००९ पासून हे सर्च इंजिन उपलब्ध आहे. अनेकांनी याचा वापरही केला आहे. या सर्च इंजिनची टीम सतत नवं संशोधन करत असते. नव्या वेबसाईट्सचा समावेश यात केला जातो. त्यामुळे कोणतीही माहिती शोधण्यासाठी 'स्वीट सर्च'ची मदत घ्यायला हरकत नाही.

**दोस्त हे मस्त**

## सर्वात छोटा डॉल्फिन

व्हॅक्युटा हा जगातला सर्वात छोटा डॉल्फिन आहे. कॅलिफोर्निया आणि मेक्सिकोमध्ये या प्रजातीचे डॉल्फिन आढळतात. या डॉल्फिन्सची संख्या झपाट्याने कमी होत आहे. खुल्या समुद्रात अवघे २०० डॉल्फिन्स उरले आहेत. त्यामुळे त्यांचं संरक्षण करणं गरजेचं आहे.



**खादाडी**

## हॉट चॉकलेट

चॉकलेट कोणाला आवडत नाही? मग आपण हॉट चॉकलेट कसं बनवायचं ते शिकू या. यासाठी चार कप दूध, तीन टेबलस्पून कोको पावडर, तीन टेबलस्पून चॉकलेटचे तुकडे, चार चमचे साखर, अर्धा चमचा वेलची पूड, चिमूटभर मीठ, क्रीम हे साहित्य घ्या. दूध मध्यम आचेवर नीट उकळून घ्या. उकळल्यावर त्यात कोको पावडर घाला. पावडरच्या गाठी होणार नाहीत याची काळजी घ्या. चमच्याने हलवत रहा. आता त्यात साखर आणि चॉकलेट घाला. मिश्रण ढवळत राहा. चॉकलेट वितळेपर्यंत थांबा. साधारण पाच मिनिटं हे मिश्रण गॅसवर राहू द्या. झालं तुमचं हॉट चॉकलेट तयार. आता ते कपमध्ये ओता. वरून क्रीम घाला आणि द्या.



**लाईफस्टाईल**

## घ्या प्राण्यांची काळजी

भरपूर घाम येत असताना तुम्ही स्वत:ला कोरडं ठेवायचा प्रयत्न करता. तसंच तुमच्या मुक्या दोस्तालाही कोरडं ठेवायला हवं. घरात कुत्रा किंवा मांजर असेल तर त्यांची काळजी घ्यायला हवी. पाळीव प्राणी भिजले तर त्यांना लगेच कोरडं करा. त्यांची त्वचा फार वेळ ओलसर राहणार नाही याकडे लक्ष द्या. वेळोवेळी त्यांचे केस कापून घ्या. नखंही कापून घ्या. प्राणी ओले राहिले तर त्यांना काही आजार होऊ शकतात हे लक्षात ठेवा.



**योगा टाईम**

## बलासन

शारीरिक क्षमता वाढवण्यासोबतच तोल सांभाळण्यासाठी तुम्हाला बलासन उपयुक्त ठरू शकतं. जमिनीवर ताठ बसा. पाय थोडे वर घेऊन दुमडा. गुडघे बाहेरच्या बाजूला असायला हवेत. हातांनी पायांना आधार द्या. आता या स्थितीत काही काळ रहा. हळूहळू पाय खाली घ्या.






**उषा नाईक ही अभिनेत्री खरंतर १९७० ते १९९० या तीन दशकांतील आघाडीची नायिका. अनेक उत्तमोत्तम मराठी चित्रपटांतून त्यांनी कामे केली. नृत्य व अभिनयाने त्यांनी मराठी चित्रपट गाजविले. चित्रपती व्ही. शांताराम यांच्यापासून अनंत माने, कमलाकर तोरणे, गोविंद कुलकर्णी, दादा कोंडकेंपर्यंत अनेक नामवंत दिग्दर्शकांच्या हाताखाली त्यांनी कामे केली. त्यांच्या अनेक चित्रपटांत त्यांचे नायक कुलदीप पवार होते. त्यानंतर रविंद्र महाजनी, अविनाश मयुरेकर, अशोक सराफ आदी नायकांसह त्यांनी भूमिका केल्या. महाराष्ट्र शासनाने यावर्षी चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.**

# उषा नाईक, आणि पुरस्कारांचे राजकारण



**शरद कोरडे**

उषा नाईक यांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव या शहरात एका सामान्य कुटुंबात झाला. घरांत नृत्याची आवड असल्याने त्यांच्या वडिलांनी त्यांना नृत्याचे प्रशिक्षण नृत्यगुरूंकडून बेळगावातच दिले. आपण नृत्यात करिअर करायची असे त्यांनी लहानपणापासूनच ठरविले होते. बेळगावपासून कोल्हापूर ही कलानगरी जवळ असल्याने आपल्या आईसह त्या बेलापूरला मंगला विभुते या ओळखीच्या अभिनेत्रीकडे आल्या. त्यावेळी त्या एका मराठी चित्रपटात काम करीत होत्या. त्यांच्यासोबत त्या शालिनी स्टुडिओमध्ये एका चित्रीकरणासाठी गेल्या. तेथे एका गाण्याच्या नृत्याची तालीम सुरू होती. त्या गाण्याच्या कोरसमध्ये अनेक मुली होत्या. त्यात उषा नाईक यांनाही सामावून घेण्यात आले. नृत्य दिग्दर्शकाला उषा नाईक यांचे नृत्य आवडले. त्यांच्या प्रसन्न आणि बोलत्या चेहऱ्यावर उत्तम हावभाव प्रकटताना त्यांनी पाहिले. पुढे रिहर्सल थांबवून त्यांनी उषा नाईक यांना एकटीलाच त्या गाण्याच्या तालावर नाचायला सांगितले. इतक्याच चित्रीकरणासाठी आलेले अरूण सरनाईक, जयश्री गडकर व अनंत माने तेथे आले. त्यांनाही उषा नाईक यांचे नृत्य व त्यांच्या चेहऱ्यावरील भाव आवडले. अरूण सरनाईक यांनी आपणही या मुलीचे नृत्य बेळगाव येथे पाहिले असल्याचे व मी या मुलीला ओळखतो असे अनंत मानेंना सांगितले. त्यांनी तीन दिवसांच्या चित्रीकरणात उषा नाईक यांना सहाय्यक नर्तिका म्हणून कोरसमध्ये घेतले. जयश्री गडकर या नामवंत अभिनेत्रीसोबत नृत्य करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यानंतर जीवनकला, उमा यांच्यासह कोरसमध्ये नृत्य करण्याची संधी त्यांना मिळाली. कोल्हापूरमध्ये त्यावेळी सुप्रसिद्ध लेखक शंकर पाटील यांनी 'आम्ही गोकुळच्या गौळणी' हे नाटक लिहिलेले होते. या नाटकात पाच नायिका असतात त्या पाचही नृत्यांगना असतात. या नाटकात एक नायिका म्हणून उषा नाईक यांना घेण्याची सूचना दिग्दर्शक अनंत माने यांनी शंकर पाटलांना केली. त्यानुसार या नवीन नाटकांत उषा नाईक यांचा प्रवेश झाला. हे नाटक खूप गाजले व प्रेक्षकांनी त्यांना चांगला प्रतिसाद दिला. व्ही. शांताराम यांना हे कळल्यावर त्यांनी राजकमल कलामंदिरात या नाटकाचा प्रयोग आयोजित केला. या नाटकास व्ही. शांताराम यांचे सारे कुटूंब उपस्थित होते. सर्वांनाच हे नाटक आवडले व त्यांनी कलाकाराचे कौतुक केले.

व्ही. शांताराम यांनी १९७२ आपल्या 'पिंजरा' या चित्रपटांतील गाण्यांसाठी संध्या सह कोरसमध्ये नृत्य करण्यासाठी सहनर्तिका म्हणून उषा नाईक व माया जाधव यांची नियुक्ती केली. त्यानंतर जब्बार पटेल यांच्या 'सामना' या चित्रपटांतील एका सोलो गाण्यासाठी उषा नाईक यांचा पाचारण करण्यात. उषा नाईकांवर चित्रीत झालेलं हे पहिलेच सोलोगीत. जगदीश खेबुडकर यांनी लिहिलेल 'सख्या रे घायाळ मी हरिणी' हे गूढ गीत उषा नाईक यांनी नृत्यकौशल्याने व अभिनयाने अजरामर केले. १९७५ मध्ये उषा नाईक यांनी कमलाकर तोरणे यांच्या 'ज्योतिबाचा नवस' व राजा बारगीर यांच्या 'करावं तसं भरावं' या चित्रपटांत छोट्या भूमिका केल्या. याच वर्षी अनंत माने यांनी निर्मिती केलेला व दिग्दर्शित केलेल्या 'पाच रंगाची पाच पाखर' या चित्रपटात उषा नाईक यांना प्रथम सहनायिकेची भूमिका मिळाली. या चित्रपटात अरूण सरनाईक, जयश्री गडकर यांच्यासह उषा नाईक, माया जाधव, कमला कुमारी, शोभना व जयमाला ह्या नृत्यांगना होत्या. या चित्रपटामुळे उषा नाईक प्रसिद्धीच्या झोत्यात आल्या व पुढे त्यांना नायिकेच्या भूमिका मिळाल्या. १९७७ मध्ये उषा नाईक यांना गोविंद कुळकर्णी यांचा 'बन्या बापू' हा विनोदी चित्रपट मिळाला, ज्यात त्या अभिनेता मोहन गोखले यांच्या नायिका होत्या. सोबत बाळ कर्वे, सरला येवलेकर ही जोडी होती. त्याचबरोबर यावर्षी अनंत माने यांचा 'कलावंतीण' हा महत्वाकांक्षी चित्रपट मिळाला. ज्यात मुख्य कलावतीच्या भूमिकेत उषा नाईक होत्या. सत्यशील व साहसी असलेल्या या तमाशा नृत्यांगनेच्या भूमिकेत त्यांनी बहारदार रंग भरले. या चित्रपटात त्यांचा नायक होता अविनाश मसुरेकर, सोबत कुलदीप पवार व रंजना ही जोडी होती. यातील 'दरबार जुना ह्या हंड्याझुंबर नाव' हे शोभा गुर्टू यांनी गाईलेले जगदीश खेबुडकर याचे गाणे खूप गाजले होते. या चित्रपटांतील नायिकेच्या भूमिकेसाठी राज्य सरकारी पुरस्कारासाठी त्यांचे नामांकन झाले होते. तथापि त्यांनी राज्य सरकारकडून विशेष ज्युरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




त्यानंतर उषा नाईक यांनी अनंत माने यांच्या 'सुशीला' मधील सहनायिका शैलजा देशमुख, 'भैरू पैलवानकी जय' मधील मीना, 'दुनिया करी सलाम' मधील मैना,'हळदी कुंकू'मधील सहनायिका रत्नावली 'बाईकवेडा' मधील अशोक सराफाची पत्नी या आव्हानात्मक भूमिका होत्या. हे चित्रपट १९७८ सालातील होते. त्यानंतर त्यांनी 'जिद्द', 'संसार', 'आई' तोतया आमदार, 'गोंधळात गोंधळ', 'दोन बायका फजिती ऐका', 'गल्ली ते दिल्ली', 'राखणदार', 'भन्नाट भानू', 'कुलस्वामिनी अंबाबाई', 'पायगुण', 'देवाशपथ खरं सांगेन', 'आंधळा साक्षीदार', 'एक होता विदुषक', 'नवसाचा पोर', 'घे भरारी', 'बरखा सातारकर', आदी चित्रपटांतून महत्त्वाच्या भूमिका केल्या. १९८२ मधील 'दिसतं तर नसतं', १९८४ मधील 'जगावेगळी प्रेमकहाणी', १९८८ सालांतील 'दे धडक बेधडक', या चित्रपटांतून त्यांनी दुहेरी भूमिका केल्या. उषा नाईक यांनी 'देखा प्यार तुम्हारा' या हिंदी चित्रपटांतून 'सीमा कपूर', ही भूमिका केली होती. त्यांनी काही गुजराथी व भोजपुरी चित्रपटांतूनही भूमिका केल्या आहेत. यांनी दादा कोंडके यांच्या 'येऊ का घरात' या चित्रपटांतही नायिकेचे काम केले होते.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाने या २०२२ सालचा चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार उषा नाईक यांना जाहीर झाल्यावर त्यांनी चित्रपटसृष्टीत पुरस्कारांवर माझ्यावर कायम अन्यायच झाला आहे. अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. आपल्या विधानाला पुष्टी करण्यासाठी त्यांनी काही दाखले दिले आहेत. फिल्म इंडस्ट्रीजमध्ये माझा कोणीही गॉडफादर नसल्याने मी कायम मागे पडले. 'अल्ट्रा मराठी बाज' या दूरदर्शन चॅनेलच्या सीनेपत्रकार दिलीप ठाकूर यांना मुलाखत देताना त्या म्हणाल्या, मला व्ही. शांताराम यांना नावाचा पुरस्कार मिळाला याचे मला नवल वाटले नाही. मी त्यांच्याकडून शिकले आहे व त्यांच्या सानिध्यात राहिले आहे. देखावा कसा करावा हे मला माहीत नाही. मी छोट्या कुटुंबातून आलेली आहे. चांगले काम करीत राहणे व काम स्विकारणे हेच मी शिकत आले आहे. मी आध्यात्मिक वातावरणात वाढले आहे. बेळगावच्या कलावती आई ह्या माझ्या गुरू आहेत. मी समाधानी आहे, संयमी आहे. माझ्याबाबत पुरस्कारांचे खूप राजकारण झालेले आहे. 'हळदी कुंकू' व कलावंतीण हे दोन्ही चित्रपट एकाच वर्षी आले होते. 'सर्वोत्कृष्ट नायिका' या शासनाच्या पुरस्कारासाठी माझी निवड झालेली होती व निवड समितीतील त्यागराज पेंढारकर (भालजी पेंढारकर यांचे पुत्र व नामवंत कॅमेरान, दिग्दर्शक) यांनी मला तसा संदेश पाठवून अभिनंदन केले होते. पण आयत्यावेळी चक्रे फिरली व दादा कोंडकेच्या अनेक चित्रपटांतून कामे करूनही उषा चव्हाण यांना पुरस्कार मिळाला नव्हता. त्यांना पुरस्कार देऊ असा एका मंत्र्याने दादा कोंडकेंना शब्द दिला होता. त्यानुसार 'बोट लावीन तिथं गुदगुल्या' या चित्रपटासाठी उषा चव्हाण यांना सर्वोत्कृष्ट नायिका म्हणून पुरस्कार देण्याचे निवड समितीला डावलून ठरविण्यात आले, पण निवड समितीने नाराजी दर्शविल्यामुळे मला 'विशेष नायिका' म्हणून पुरस्कार देण्यात आला. पुढे १९८५ साली 'देवा शपथ खरं सांगेन' या चित्रपटांतील मीरा पाटील या माझ्या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट नायिका म्हणून माझे नाव निश्चित आले होते. त्यानंतर मला सांस्कृतिक खात्याकडून फोन आला, 'तुम्ही उत्तम अभिनेत्री आहात. तुमच्या अभिनय कौशल्याच्या जोरावर पुढेही असे पुरस्कार मिळतील. यावर्षी आपण 'स्त्रीधन' या सिनेमासाठी अलका कुबल यांना पुरस्कार देऊया. तुम्ही समजून घ्या. अलका कुबल तुमच्याही चांगल्या स्नेही आहेत. हे सारे ऐकून व न पटूनही मी शांत राहिले. मनातून वाईटही वाटले. असे प्रसंग अनेकवार माझ्या आयुष्यात आले. पण मी मनाचा तोल ढळू दिला नाही. उषा नाईक यांनी आपल्या मनातील व्यथा बोलून दाखविली.

उषा नाईक यांनी चित्रपटच नव्हे तर मराठी नाटकांतूनही उत्तमोत्तम भूमिका साकारल्या. कोल्हापूरात शंकर पाटील लिखीत 'आम्ही गोकुळच्या गौळणी' मुंबईत नटेश्वर निर्मित व कमलाकर सारंग दिग्दर्शित 'जंगली कबूतर' या नाटकात त्यांनी 'गुल' या नायिकेची भूमिका केली, जी त्यापूर्वी लालन सारंग यांनी केली होती. रंजन थिएटरमार्फत रंजन दारळेकर लिखीत 'सारंगा तेरी यादमे' या नाटकातही त्यांनी नायिकेचे काम केले होते. उषा नाईक यांनी सुमारे १२५ चित्रपटांतून भूमिका केल्या आहेत. 'देवाशपथ खरं सांगेन' या चित्रपटासाठी त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून पुरस्कार मिळाला. 'काल रात्री बारा वाजता' या चित्रपटासाठी त्यांना नृत्य दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला. 'एका हजाराची नोट' हा श्री हरी साठे यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'सिल्व्हर पिकॉक' मिळवून सर्वोत्कृष्ट फिचर फिल्म पुरस्कार मिळवून विजयी झाला. या चित्रपटातील मध्यवर्ती भूमिका उषा नाईक यांनी केली होती. सोबत संदीप पाठक, पूजा नायक व गणेश यादव होते. उषा नाईक यांनी मराठी दूरदर्शनवरील 'फुलाला सुगंध मातीचा' या मालिकेतही काम केले आहे. त्यांच्या पुढील प्रकल्पासाठी शुभेच्छा. ●●

# संगीत शिरोमणी कुंदनलाल सहगल





**श्रीराम शेटये**

एक असा भारतीय गायक ज्याने भारतीय चित्रपट संगीत क्षेत्रात ईतिहास घडविला. ज्याच्या गायकीचे पंडीत भिमसेन जोशी, लता मंगेशकर यांच्यासारखे दिग्गज दिवाने होते. एका नृत्य आणि गायण करणाऱ्या वेश्या स्त्रिला त्यांनी आपली गुरूमाता मानली. तीच्याकडून ठूंबरी हा गायणाचाही प्रकार आत्मसात केला. गायनासाठी घरचे सर्व वैभव सोडून घराचा त्याग केला. गाणी गात गात दारोदारी साड्या विकल्या.

मुकपटांच्या जमात्यातून चित्रपट सृष्टी बोलपटांच्या दिशेने वाटचाल करीत होती. अशा सुरवातीच्या काळात गायक आणि नट असलेल्या कुंदनलाल सहगल यांची वाटचाल सुरू झाली. हिंदी चित्रपट सृष्टीचे पहिले सुपरस्टार आणि पहिले गायक नट कुंदनलाल सहगलच होते. लता मंगेशकर, मुकेश, महमद रफी, किशोर कुमार ज्यांच्याकडून प्रेरणा घेऊनच हे सगळे गायनक्षेत्रात आले. त्या सगळ्यांनाच गुरूस्थानी असणारे सर्वश्रेष्ट गायक म्हणजेच सहगल. गायनाच्या अनेक पीढ्या येतील परंतु, सहगल यांचे स्थान ध्रुवपदासारखे अजिंक्य राहिल. सहगल हे गायनक्षेतातील भीष्म पितामह आहेत.

पंजाब प्रांतातील जालंदरमधून जम्मूमध्ये येऊन वसलेल्या सहगल परिवारात ११ एप्रिल १९०४ साली कुंदनलाल यांचा जन्म झाला. कुंदनलाल यांचे वडील तहसिलदार होते. त्या काळात तहसिलदाराच्या घरात जन्म घेणे म्हणजे एखाद्या राज्याच्या घरात जन्म घेण्यासारखेच होते. जम्मूमधील सुप्रसिद्ध सुफी ईमामाने भविष्यवाणी केली होती हा मुलगा एक दिवस आपल नाव मोठे करेल.

पाच वर्षाचा कुंदन गाढ झोपेत असतानाच त्याच्या कानावर लोकसंगीताची धून येत असे. झुंझूमुंजू झाल की काश्मीरच्या निसर्गसंपन्न डोंगरावरील धुके थोडे कमी झालेल असायचे. हळूवार पहाटे पहाटे बासरीचे मोहित करणारे मधूर स्वर आणि डोंगरी गीतांचे ध्वनी कानांत गुंजत असतानाच कुंदन झोपेतून हळू हळू जागा व्हायचा. कुंदनची आई खुप सुंदर गात असे.

कुंदन शाळेत जाऊ लागला पण त्याचे लक्ष अभ्यासाकडे नसायचे. शिक्षक गणित शिकवायचे पण कुंदनचे लक्ष मात्र, डेरेदार वृक्षानी बहरलेल्यां काश्मीरच्या सुंदर वनातून गाणाऱ्या गुराख्यांच्या गायनाकडे असायचे. कुंदन शाळेतून मध्येच उठून गुराख्यांची गाणी ऐकण्यासाठी पळून जात असे म्हणून त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी वडीलांनी एक नोकर नेमला होता. कुंदन त्याच्या हातावर तुरी देऊन पळून जात असे व शाळा सुटण्याच्या वेळेस परत येत असे.

कुंदन फक्त बारा वर्षाचा होता पण त्याच्या गायकीची चर्चा जम्मूमध्ये पसरली होती. एकदा कुंदन कश्मीरचे महाराज प्रताप सिंह यांच्या दरबारात आपल्या वडीलांसोबत गेला होता. तेथे त्याने संत मीराबाई यांचे भजन गायले. सर्व दरबार टाळ्यांच्या कडकडाटांने दणाणून गेला. महाराजांनी कुंदनची पाठ थोपटली. महाराज म्हणाले भविष्यात हा मुलगा मोठा गायक होईल. या मुलाच्या जिभेवर सरस्वती बसली आहे.

एक दिवस सुप्रसिध्द रामलीला कलाकार परशुराम नागर घरी आले. त्यांनी कुंदनच्या वडीलांना समजाऊन रामलीलामध्ये कुंदनला सीतेच्या भुमिकेसाठी तयार केले. स्वत: परशुराम नागर रामाची भुमिका करीत असत. त्यांनी कुंदनला गायन आणि अभिनयाचे विविध पैलू शिकविले. सीता बनलेला कुंदन आपल्या भुमिकेतील गायन आणि अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यात अक्षरक्षः पाणी आणत असे. शो संपल्यावर महिला सीता बनलेल्या कुंदनच्या पायाला स्पर्श करून नमस्कार करीत असत. एक दिवस कुणाची नजर लागली कुणास ठाऊक? लहानग्या कुंदन चा आवाज अचानक बंद झाला. 'आई मी आता कधीच गाऊ शकणार नाही' असे म्हणत कुंदन रात्रभर रडत राहिला. आई खुप घाबरली पीर बाबा सलमान युसुफच्या दरबारात घेऊन गेली. बाबा म्हणाले, 'घाबरू नका उद्यापासून माझ्याकडे पाठवून द्या मी स्वत: त्याला संगीत शिकवणार'. दोन वर्षानंतर सलमान बाबाचे अंगण कुंदनच्या मधुर सरांनी गुंजू लागले होते. काही काळाने कुंदनचे वडील सेवानिवृत्त झाले. जालंधरला गावी आले. कुंदन पुढील शिक्षणासाठी आपल्या काकांच्या बरोबर जम्मूमध्येच राहिला. मप्रिन्स ऑफ वेल्सफ कॉलेजात ॲडमिशन घेतले. परंतु, कुंदन शिक्षण पूर्ण करू शकला नाही एक दिवस कॉलेज आणि जम्मू दोन्ही सोडून कुंदन जालंधरला आपल्या घरी परतला. साल १९२६ जालंधरमध्ये कुंदनच्या वडीलांनी रिटायर्ड झाल्यावर ठेकेदारी सुरू केली होती. कुंदनने त्यांच्या धंद्यात यावे अशी वडीलांची इच्छा होती. पण कुंदनला गायन क्षेत्रात जायचे होते. एक दिवस वडीलांनी घर डोक्यावर घेतले. त्यांनी कुंदनला इशारा दिला. घरात रहायचे असेल तर संगीताचा नाद सोड. घर किंवा संगीत या पैकी एक निवड. आयुष्यभर तुझा बोझ उचलायचा मी ठेका घेतलेला नाही.

कुंदनने घर सोडण्याचा निर्णय घेतला आणि दिल्लीची ट्रेन पडली. दिल्लीत मित्रांच्या मदतीने विद्युत विभागात नोकरी मिळाली. नंतर मिलिटरी इंजिनियर सर्विसमध्ये शिफ्ट अटेंडट ची नोकरी केली. पण या नोकरीत मन रमत नव्हते.कुंदन गाणी गात गात साडी विकत होता. पण संगीत क्षेत्रात जायचे स्वप्न अधुरेच होते.त्याच दरम्यान, जालंधर येथिल कुंदनचे शेजारी संगीत निर्देशक हरिश्चंद्र बाली यांची कानपूरमध्ये अचानक कुंदनबरोबर भेट झाली. त्यांनी कुंदनला कलकत्ता येथे येऊन भेटायचा सल्ला दिला. साडीवाल्या शेटजींची कलकत्ता येथे एक शाखा होती. त्यांनीच रहाण्याची व जेवनाची सोय केली. जो पर्यंत संगीत क्षेत्रात नोकरी मिळत नाही तोपर्यंत साड्या विकत रहायची सवलत दिली.

कलकत्ता येथे गेल्यावर हरिश्चंद्र बाली कुंदनला आर.सी. बोराल यांच्याकडे घेऊन गेले. बोराल यांनी न्यु थिएटरचे मालक बी. एन. सरकार यांना विनंती करून कुंदनची शिफारस केली. दोनशे रुपये पगार आणि पाच रुपये प्रतिदिन भत्ता अशी नोकरी ठरली. अट होती कुंदनने बांगला भाषा आणि शास्त्रिय संगीत शिकावे लागेल. एग्रीमेंट बनवली गेली. न्यु थिएटरने सहगल यांना घेऊन सन १९३२ मध्ये मोहब्बत के आसु हा पहिला चित्रपट काढला. चित्रपट आपटला नंतर आलेले आणखीन दोन चित्रपट आपटले. पण प्रचंड आत्मविश्वास असलेल्या बी. एन. सरकार यांनी सहगल यांना घेऊन 'पुरण भगत' हा चित्रपट काढला. त्या चित्रपटाची गाणि लोकप्रिय झाली. ●●

## लहान मुलांना धाडस आणि जिद्दीचं बाळकडू देणाऱ्या ॲनिमेटेड 'बुनी बियर्स' चित्रपटाचे पोस्टर लाँच!

**राम कोंडीलकर**



कोवळ्या वयात असणाऱ्या मुलांच्या अंगी चांगल्या संस्कारांची जर पेरणी झाली, तर मुलं मोठी होऊन नक्कीच चांगल्या वळणावर आयुष्य जगू शकतात. मुलांमध्ये संस्कारांची उत्तम पेरणी ही आई उत्तम करते असते, म्हणूनच जागतिक 'मदर्स डे'चं निमित्त साधून 'बुनी बियर्स' या लोकप्रिय ॲनिमेटेड चित्रपटाच्या मालिकेचा पुढचा भाग 'बुनी बियर्स गारडियन्स कोड' हा १० मे २०२४ रोजी भारतभर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रस्तुत 'बुनी बियर्स गारडियन्स कोड' या चित्रपटाचा नुकतेच पोस्टर लाँच झाले असून सर्व सोशल मिडियावर प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. चित्रपट इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. पोस्टरमध्ये असणाऱ्या धमाल पात्रांना बघितल्यावर चित्रपटात धमाकेदार कथा असून धमाल मजा येणार असल्याचे दिसत आहे. चित्रपटाची कथा आणि यातील प्रसंग भारतातल्या चिमुलकल्यांसोबतच इतर सर्व रसिक प्रेक्षकांचं मन जिंकून घेणार असल्याचं दिसत आहे.

''मदर्स डेचंनिमित्त साधून बालकांना जगण्याची चांगली शिकवण देणारा चित्रपट 'बुनी बियर्स' प्रदर्शित करताना मनापासून आनंद होत आहे. अशा अनेक नवनवीन ॲनिमेटेड चित्रपटांमधून मनोरंजनासोबतच लहान मुलांना धाडस आणि जिद्दीचं बाळकडू देण्याचा प्रयत्न आहे.'' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.ई.ओ. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)